रायगड, नवी मुंबई


# राम प्रहर

वर्ष १७ • अंक २९६

www.ramprahar.com

बुधवार, १४ मे २०२५ • पाने ८ • किंमत ₹२

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून भारतीय जवानांचे कौतुक



**जालंधर** : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांना उद्ध्वस्त करीत मोठी कारवाई केली. यानंतर मंगळवारी (दि. १३) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदमपूर हवाई तळावर जाऊन जवानांशी संवाद साधला. या वेळी बोलताना त्यांनी, जगाने भारतीय एअरफोर्सची ताकद बघितली आहे, असे म्हणत जवानांचे कौतुक केले. दहशतवाद्यांनी आमच्या माता भगिनींचे कुंकू पुसले होते. त्यामुळे भारताने दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. भारताच्या या हल्ल्यात १००हून अधिक दहशतवाद्यांना ठार करण्यात आले, असे सांगून पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला पुन्हा एकदा इशारा दिला की, भारताने दहशतवादाविरोधातील कारवाई फक्त स्थगित केलीय, पण भारत व भारतीय नागरिकांना कोणत्याही धोक्यापासून वाचवण्यासाठी सातत्याने निर्णायक पावले उचलत राहू.

अंतरंग

रोहा तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा/२

दामत गावात गोहत्या बंदीचा मोठा निर्णय/५

आयपीएलचे उर्वरित सामने १७ मेपासून/८

# दहावीच्या परीक्षेतही कोकणच सरस! राज्याचा एकूण निकाल ९४.१० टक्के; मुलींची बाजी

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेला इयत्ता दहावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल मंगळवारी (दि. १३) जाहीर करण्यात आला आहे. राज्याचा दहावीचा निकाल ९४.१० टक्के लागला असून बारावीप्रमाणे कोकण विभाग पुन्हा एकदा अव्वल ठरला आहे. दहावीच्या निकालातही मुलींनी बाजी मारली आहे.

या वर्षी दहावीच्या परीक्षेत राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून एकूण १५,५८,०२० नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी १५,४६,५७९ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले, तर १४,५५,४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



सर्व विभागीय मंडळांमध्ये कोकण विभागाने बाजी मारली आहे. कोकण विभागाचा निकाल ९८.८२ टक्के आहे. सर्व विभागीय मंडळातून नियमित मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९६.१४ टक्के असून मुलांची टक्केवारी ९२.३१ टक्के आहे. याचाच अर्थ नेहमीप्रमाणे मुलींनी निकालात बाजी मारली आहे. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ३.८३ टक्के जास्त आहे.

राज्यातून नियमित उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी ४,८८,७४५ विद्यार्थी प्राविण्यासह प्रथम श्रेणीत (७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण), ४,९७,२७७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत (६० टक्क्यांपेक्षा जास्त गुण), ३,६०,६३० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत (४५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण), १,०८,७८१ विद्यार्थी उत्तीर्ण श्रेणीत (३५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण) उत्तीर्ण झाले आहेत.

**विभागनिहाय कामगिरी**

| | | | |
|---|---|---|---|
| कोकण | ९८.८२ | अमरावती | ९२.९५ |
| कोल्हापूर | ९६.७८ | छ. संभाजीनगर | ९२.८२ |
| मुंबई | ९५.८४ | लातूर | ९२.७७ |
| पुणे | ९४.८१ | नागपूर | ९०.७८ |
| नाशिक | ९३.०४ | एकूण | ९४.१० |

**निकालाची आकडेवारी टक्क्यांमध्ये आहे.**

# खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल

## सीबीएसई दहावी, बारावी परीक्षेत धवल यशाची परंपरा यंदाही कायम







**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक उत्कृष्टतेची परंपरा कायम राखली आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) इयत्ता बारावी आणि दहावीच्या परीक्षेच्या निकालात शाळेने १०० टक्के यश मिळवले. याबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, शाळेतील प्रशिक्षित व समर्पित शिक्षकवर्गाचे मार्गदर्शन तसेच मुख्याध्यापिका राज अलोनी यांचे नेतृत्व आहे. मुख्याध्यापिका अलोनी यांनी सांगितले, हा १००% निकाल केवळ आकडा नाही, तर आमच्या विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या आणि पालकांच्या अथक मेहनतीचे प्रतीक आहे. आमचे ध्येय केवळ शैक्षणिक यश नव्हे; तर मूल्याधिष्ठित, शिस्तबद्ध आणि नाविन्यपूर्ण शिक्षण देणे हे आहे. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल भविष्यातील नेतृत्व घडवणारी संस्था म्हणून सतत प्रगतिपथावर आहे आणि शिक्षणाच्या क्षेत्रात तेजस्वी दीपस्तंभासारखी उजळत आहे.

या यशाबद्दल शाळेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचे अभिनंदन करीत आनंद व्यक्त केला. **(पान २ वर..)**

# शिवाजीनगर क्रिकेट अकादमीत आरडीसीए प्रीमियर लीगचा उत्साह

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

### एमसीए अध्यक्ष आमदार रोहित पवार यांची प्रमुख उपस्थिती




**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथील क्रिकेट अकादमीमध्ये आरडीसीए प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा मोठ्या उत्साहात शुभारंभ झाला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)चे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. १२) या स्पर्धेचे उद्घाटन झाले.

या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी हे क्रिकेट मैदान सर्वांसाठी खुले असल्याचे सांगितले तसेच या मैदानाच्या विकासासाठी आर्थिक मदत करण्यासाठी आपण नेहमीच तयार राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. क्रिकेट खेळाला चालना मिळावी आणि गावातील खेळाडूंमधील क्रीडा कौशल्य वाढावी यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमीच प्रयत्नशील असतात. त्यांच्याच संकल्पनेतून शिवाजीनगर येथे क्रिकेट अकादमी सुरू आहे.

एमसीएचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी खेळाडूंशी संवाद साधला व क्रिकेट खेळण्याचा आनंद घेतला. उद्घाटन समारंभाला माजी आमदार अनिकेत तटकरे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, आरडीसीए अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सदस्य सागर ठाकूर, **(पान २ वर..)**



## निवडक

### पोलादपुरात सार्थक शेठ प्रथम

**पोलादपूर :** तालुक्यातील १८ माध्यमिक शाळांचे एसएससी बोर्डाचे निकाल कौतुकास्पद असून पालक विद्यार्थी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलादपूर शहरातील यशवंत इंग्लिश मीडियम स्कूलने अकरा वर्षे शंभर टक्के निकालाची परंपरा निर्माण केली असून या शाळेचा सार्थक धीरज शेठ हा तालुक्यात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.

### कर्जतमध्ये आर्या सुर्वे प्रथम

**कर्जत :** मार्च – २०२५ मध्ये झालेल्या दहावी शालांत परीक्षेत नेरळ येथील एल ए ई एस इंग्लिश हायस्कुलच्या आर्या मिलिंद सुर्वे हिने ९७.६० टक्के गुण मिळवीत कर्जत तालुक्यात सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळविला. याच शाळेतील परी प्रसून स्वरूप ही ९७.४० टक्के गुण मिळवून तालुक्यात द्वितीय आली आहे. तर प्राची प्रशांत सपकाळ हिने ९६.६० टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक पटकवला. ही सुद्धा त्याच शाळेची विद्यार्थिनी आहे. यंदा एकाच शाळेतील विद्यार्थ्यांनी तालुक्यात पहिले तीन क्रमांक मिळविले आहेत. ही घटना गेल्या तीस–चाळीस वर्षांनंतर प्रथमच घडली आहे. बारावी प्रमाणेच दहावीत सुद्धा मुलींनीच बाजी मारली आहे.

### ६५ शाळांचा १०० टक्के निकाल

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील १५७ शाळेतील विद्यार्थ्यांनी १० वीची परीक्षा दिली होती. त्यापैकी ६५ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. सेंट झेवियर्स हायस्कूल ऐरोली या शाळेतील ६२० विद्यार्थी तर नेरुळ येथील शाळेतून ३३८, वाशी येथील सेंट मेरी हायस्कूल ४४४, सेंट लॉरेन्स ३१८, फादर ॲग्नेल शाळेतील २७८असे सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

### तांबडी येथील अल्पवयीन मुलीचे हत्या प्रकरण

# रोहा तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तांबडी येथील एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. या खटल्याचा माणगाव कोर्टात ८ मे रोजी निकाल लागला आणि सर्व आरोपी निर्दोष ठरविण्यात आले. कोर्टाने दिलेला निर्णय दुर्दैवी असल्याने रोह्यातील शेकडो महिलांसह नागरिकांनी पीडित कुटुंबियांना न्याय मिळावा यासाठी मंगळवारी (दि. १३) तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढला.

तांबडी येथे २६ जुलै रोजी अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून हत्या केल्याची घटना घडली होती. यानंतर रोहा पोलिसांनी सात जणांविरोधात गुन्हा दाखल करून अटकही केली. या प्रकरणाचा खटला चालवण्यासाठी शासनाने विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती केली होती, मात्र सर्व आरोपींना सबळ पुराव्याअभावी माणगाव न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. कोर्टात दुर्दैवी व अन्यायकारक निकाल लागल्याने संपूर्ण रोह्यात संतापाची लाट पहायला मिळाली. त्या अनुषंगाने मंगळवारी रोह्यातील राम मारुती चौक ते तहसीलदार कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला होता.




**प्रशासन पीडित कुटुंबियांच्या पाठिशी ठामपणे उभे आहे. मुंबई उच्च न्यायालयात चांगले वकील देऊन खटला चालवण्यात येईल तसेच आपण दिलेल्या मागण्यांचे पत्र जिल्हाधिकारी यांच्याद्वारे शासनापर्यंत पोहचविण्यात येईल. –ज्ञानेश्वर खुटवड, रोहा प्रांत अधिकारी**

या वेळी महिलांनी मागण्यांचे पत्र प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांना दिले तसेच आरोपींना फाशी व आम्हाला न्याय द्या, अशा घोषणा देत हंबरडा फोडला. या मोर्चात सर्व समाज बांधव व विविध राजकीय पक्षातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

दरम्यान, सकल मराठा समाजाच्या वतीने दिलेल्या मागण्या पूर्ण न केल्यास यापुढे प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा समाजाचे अध्यक्ष आप्पा देशमुख यांनी दिला.

तर खटला उच्च न्यायालयात चालवला गेला पाहिजे व संबंधित त्या वेळचे तपासी अधिकारी यांची चौकशी केली गेली पाहिजे तसेच ज्या काही त्रुटी राहिल्या असतील त्यादेखील तपासून प्रशासनाने कुटुंबियांना न्याय द्यावा, अशी मागणी भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी केली आहे.

# रोहयो योजनेंतर्गत शुक्रवारी जिल्ह्यात शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यात ठिकठिकाणी शिबिरे आयोजित करून वैयक्तिक लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. सदर शिबिरे १६ मे पर्यंत घेण्यात येणार आहेत. ग्रामपंचायत स्तरावर जास्तीत जास्त नागरिकांनी शिबिरांमध्ये सहभागी होऊन वैयक्तिक योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांनी केले आहे. या शिबिरांचे तालुकास्तरावर आयोजन करण्यात येणार आहे. वैयक्तिक लाभाच्या योजना राबवून रोजगार हमी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना रोजगार निर्मिती करण्यात येते. शोषखड्डा, शौचालय, घरकुल, विहिरी, फळबाग, वृक्ष लागवड, शेळीपालन शेड, कुक्कुटपालन शेड, गुरांचा गोठा, शेतीची बांध बंदिस्ती व दुरुस्ती या वैयक्तिक लाभाच्या योजनेतून रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगार निर्मिती करण्यात येते. यामुळे वैयक्तिक लाभाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी तालुकास्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरांचे माध्यमातून वैयक्तिक लाभार्थ्यांची निवड करून, या कामांमधून रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ग्रामपंचायतींनी गावातील जास्तीत जास्त नागरिकांना योजनेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव यांनी केले आहे.

# मुंबई मराठी पत्रकार संघाचे प्रतिष्ठेचे क्रीडा पुरस्कार जाहीर

### १९ मे रोजी होणार पुरस्कार वितरण

**मुंबई : प्रतिनिधी**

क्रीडा पत्रकारितेत अतुलनीय योगदान देणार्या पत्रकारांना मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे दिले जाणारे 'महेश बोभाटे स्मृती क्रीडा पुरस्कार' आणि 'आत्माराम मोरे स्मृती क्रीडा पुरस्कार' यांची आज घोषणा करण्यात आली. २०२० ते २०२४ या कालावधीतील पाच वर्षांचे पुरस्कार यंदा एकत्रितपणे जाहीर करण्यात आले.

ज्येष्ठ पत्रकारांसाठी दिला जाणारा 'महेश बोभाटे स्मृती पुरस्कार' क्रीडा समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांना मरणोत्तर जाहीर करण्यात आला आहे. त्याचबरोबर, महाराष्ट्र टाइम्सचे निवृत्त पत्रकार शरद कद्रेकर, संजय परब, एबीपी माझाचे विजय साळवी आणि दै. नवराष्ट्राचे सुभाष हरचेकर यांनाही या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह आणि रोख १०,००० रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

युवा पत्रकारांसाठीचे २०२० ते २०२४ सालचे 'आत्माराम मोरे स्मृती क्रीडा पुरस्कार' अनुक्रमे दै. सामनाचे मंगेश वरवडेकर, नवशक्तीचे तुषार वैती, लोकमत डिजिटलचे प्रसाद लाड, दै. सकाळचे जयेंद्र लोंढे आणि दै. लोकमतचे रोहित नाईक यांना देण्यात येणार आहेत. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह आणि ७,००० रुपये असे आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा सोमवार, १९ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात होणार आहे. भारताचे माजी हॉकी कर्णधार पद्मश्री धनराज पिल्ले, ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे आणि महाराष्ट्राचे पहिले मिस्टर इंडिया विजू पेणकर यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले जातील.

'कोविड काळापासून विविध कारणांमुळे हे पुरस्कार वितरण रखडले होते. यंदा मात्र पारदर्शक निवड प्रक्रियेद्वारे या दिग्गज पत्रकारांची निवड करण्यात आली आहे, असे मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी सांगितले.

## डॉ. राजेश पाटील नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्षपदी

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या नवी मुंबई जिल्हाध्यक्षपदी प्रकल्पग्रस्त नेते 'डॉ. राजेश पाटील' यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



राजेश पाटील यांच्या नियुक्तीने जुन्या भाजपातील कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. नवी मुंबईत भाजपात नाईक व म्हात्रे या नेत्यांमध्ये विस्तव जात नसताना, डॉ. राजेश पाटील हे दोन्ही नेत्यांना सोबत घेऊन जाणारे व्यक्तिमत्व असल्याने पक्षाने त्यांची नियुक्ती केल्याचे बोलले जात आहे.

डॉ. राजेश पाटील यांनी आपल्या राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकुशलतेमुळे नवी मुंबईत विशेष ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे पक्षाच्या स्थानिक पातळीवरील कार्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास पक्षातील नेत्यांनी व्यक्त केला आहे.

# पनवेल एज्युकेशन सोसायटीचे दहावीत सुयश

**पनवेल : वार्ताहर**

सालाबादप्रमाणे यंदाही दहावीचा निकाल आज जाहीर झाला. यामध्ये पनवेल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत तिन्ही शाळेंनी दहावीच्या परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवले आहे.

पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल काझी यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांना दरवर्षी शिक्षणासाठी सर्वोतोपरी मदत केली जाते. यंदाही पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या पनवेल येथील याकूब बेग हायस्कुलचा दहावीचा निकाल ९६.४ टक्के लागला असून एकूण १३९ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते. त्यापैकी १३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. यामध्ये १९ विद्यार्थी उत्कृष्ठ, ४९ विद्यार्थी प्रथम क्षेणीत व ५३ विद्यार्थी द्वितिय क्षेणीत पास झाले आहेत. त्यामध्ये आंबेकर सादिया आसिफ हिने ९२.४ टक्के मिळवून प्रथम, खान शाहीन फारुख ९०.२ टक्के द्वितीय तर दळवी आशिया हर्षद ८६.४ टक्के मिळवून शाळेत तृतीय क्रमांक मिळवला आहे.



तळोजा येथील नॅशनल उर्दू हायस्कुलचा निकाल ९८.४ टक्के लागला असून शाळेतून १०८ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यापैकी १०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये २० विद्यार्थी उत्कृष्ठ, ३३ विद्यार्थी प्रथम क्षेणीत व ४७ विद्यार्थी द्वितिय क्षेणीत पास झाले आहेत. यात पटेल मारियम इलियाज ९७.६ टक्के मिळवून प्रथम, खामकर रिझा जुबेर ९२.२ टक्के द्वितीय तर खामकर जैनाब अब्दुल सलाम ९१ टक्के मिळवून शाळेत तृतीय क्रमांक मिळवला आहे.

तालुक्यातील बारापाडा येथील अँग्लो उर्दू हायस्कुलचा निकाल १०० टक्के लागला असून यात अब्दुल्ला मुझाबीर रसालकर व नौफ तौसिफ़ दळवी ८७.४ टक्के तर नवाज अन्वर लांबतुरे ८६.४ मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. यासर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इकबाल काझी, चेअरमन आसिफ करेल, उपाध्यक्ष मुकीदभाई काझी, सचिव नूर पटेल, आलिम पटेल यांनी अभिनंदन केले आहे. त्याचप्रमाणे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग व शाळेतील विद्याथ्यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## मधमाशांच्या हल्ल्यातील जखमींवर उपचार

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यांतील कोळवट या गावी क्षेत्रपाल देवस्थान गावदेव मंदिरात नित्य नियमाने दर सोमवारी (दि.१२) होणारी आरती संपल्यावर मंदिर परिसरांत असणाऱ्या मधमाशांच्या पोळ्यांतील मधमाशांच्या हल्ल्यांत जखमी ४२ जणांवर उपचार सुरू आहेत. किरकोळ ते गंभीर स्वरुपाच्या दंशाने जखमा आणि विषबाधा झाल्याचे रुग्णालयाचे आधिक्षक डॉ. पावसेकर आणि पोलीस स. ई. सुनील रोहीनकर यानी सांगितले.

मधमाशांचा दंश वयोवृद्ध ग्रामस्थ लक्ष्मण बोर्ले वय ८०, सखाराम भुवड (वय ८०) यांना आधिक झाल्याने पुढील उपचारासाठी दोघा जखमीना उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथे पाठविल्याचे सूत्रानी सांगितले.

## अश्विनी बिद्रेंच्या मुलीचे सुयश

**नवी मुंबई :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा (सीबीएसई) दहावीचा निकालात सहाय्यक पोलीस निरीक्षक स्व.अश्विनी बिद्रे यांची मुलगी सिध्दी उर्फ सूची राजू गोरे हिने ९७.२० टक्के गुण मिळवत यशाचे शिखर गाठले आहे. सूची ही कोल्हापूर येथील संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूल, अतिग्रे शाळेत शिकत होती. सूचीची आई नवी मुंबईत पोलिस दलात कार्यरत असलेल्या अश्विनी बिद्रे यांची ज्यावेळी हत्या झाली त्यावेळी सूची इयत्ता पहिलीमध्ये शिकत होती. त्यावेळीच तिने आपल्या आईला डोळ्यात अखेरचे टिपले होते.

# जिल्ह्यात एफटीकेद्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक व जैविक पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी येत्या १२ मे ते ७ जून या कालावधीत जिल्ह्यात क्षेत्रीय तपासणी संच (एफटीके)द्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व १८३१ गावामध्ये ही मोहीम राबवून नागरिकांना स्वच्छ, शुद्ध गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलबध करून देण्यात येणार असल्याची माहिती रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दिली.

### काय आहे एफटीके?

**एफटीके म्हणजे क्षेत्रीय पाणी तपासणी संच आहे, जे प्राथमिक स्वरूपात पिण्याच्या पाण्यातील रासायनिक आणि जैविक घटकांची तपासणी करण्यासाठी वापरले जाते. यामुळे पाण्याची गुणवत्ता त्वरित ठरवणे, गावपातळीवर नागरिकांना पाण्यातील अशुद्धता ओळखण्यास मदत करणे हा या संचाचा उद्देश्य आहे. यामध्ये पीएच स्तर, क्लोरीन, नायट्रेट, क्लोराइड, क्लोराईड, लोह, अल्कलिनिटी, गढूळपणा, हार्डनेस, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम तसेच जैविक प्रदूषणबाबत तपासणी केली जाते. याचा प्राथमिक स्तरावर लगेच निकाल मिळतो. या संचाद्वारे पाणी पुरवठा स्त्रोत, शाळा, अंगणवाडी व घरगुती नळ जोडण्याची पाणी गुणवत्ता तपासली जाणार आहे.**

पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीमेतंर्गत रासायनिक व जैविक क्षेत्रीय तपासणी (एफटीके) संचाद्वारे गावांमध्ये जनजागृती अभियान राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. या मोहिमेंतर्गत गावात पाणी तपासणी करण्यासाठी निवड केलेल्या व संकेतस्थळावर नोंदविलेल्या पाच महिलांची पडताळणी करणे, महिलांच्या पाणी गुणवताविषयक एफटीके प्रशिक्षणाच्या नोंदी घेणे, गावात आठवी ते दहावीमधील विद्यार्थ्यांना एफटीके किटव्दारे पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक देणे, आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांमार्फत शाळा, अंगणवाड्या, घरगुती नळ जोडण्यामधील पाणी नमुने तपासणी करणे, डब्यूक्यूएमआयएस पोर्टलवर नोंदी घेणे, नळ पाणीपुरवठा योजना स्त्रोत, घरगुती नळ जोडण्या, शाळा, अंगणवाड्यांची पाणी गुणवता तपासणी करण्यासाठी रासायनिक व जैविक एफटीके संचाचे वाटप करणे, स्थानिकांना पाणी गुणवत्ता तपासणी व त्यापासून होणारे फायदे सांगितले जाणार आहे.

एफटीके संचाद्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहिमेमध्ये विविध विभागांचा सहभाग राहील. त्यामध्ये ग्रामपंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, पाणीपुरवठा विभागाचा सहभाग राहिल. सर्वांच्या मदतीने व्यापक जनजागृती मोहीम यशस्वी केली जाणार आहे.

## लोक अदालतीतून वीज ग्राहकांची एक हजार १४९ प्रकरणे निकाली

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याण परिमंडलातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित करण्यात आलेले ग्राहक तसेच वीजबिलाबाबत वाद आणि वीज चोरीच्या दाखलपूर्व व प्रलंबित अशा एक हजार १४९ प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्यात आला. तालुका न्यायालय स्तरावर १० मे रोजी आयोजित लोक अदालतीत या ग्राहकांनी सहभाग नोंदवून तीन कोटी ३९ लाखांचा भरणा करून आपापली प्रकरणे सामोपचाराने मिटवली.

कल्याण मंडल एक अंतर्गत डोंबिवली, कल्याण पश्चिम व पूर्व विभागात १९६ ग्राहकांनी ७८ लाख ३६ हजार रुपयांचा भरणा करून आपल्या प्रकरणांचा निपटारा केला. तर कल्याण मंडल दोन अंतर्गत उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, शहापूर, मुरबाड भागातील १ कोटी ८४ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या ४२७ ग्राहकांची प्रकरणे सामोपचाराने मिटवण्यात आली.


वसई, विरार, वाडा, सफाळे येथील ४६० ग्राहकांनी लोक अदालतीत ७३ लाख ३७ हजार रुपयांचा भरणा केला. पालघर, बोईसर, डहाणू, तलासरी, विक्रमगड, जव्हार, मोखाडा येथील ६६ ग्राहकांनी तीन लाख ३३ हजार रुपये भरून आपली प्रकरणे निकाली काढली.

मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, अधीक्षक अभियंते कार्यकारी व उपविभागीय अभियंते, विधी विभागाने विशेष प्रयत्न केले.

पान १ वरुन

# खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल

**विज्ञान शाखेतील टॉपर्स**



तुषार चिंचणीकर ९८.८०%




ऋषित गुप्ता ९७.००%



तर्जनी पस्तागिया ९६.४०%

**वाणिज्य शाखेतील टॉपर्स**



रूद्रेश तिवारी ९६.६०%



रिद्धी भोयर ९४.६०%



निखिल भाटिया ९४.४०%

**सीबीएसई बारावी**

सीबीएसई बारावीला शाळेतून एकूण २०५ विद्यार्थी बसले होते, ज्यात १६२ विद्यार्थी विज्ञान शाखेचे आणि ४३ विद्यार्थी वाणिज्य शाखेचे होते. सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या परीक्षा उत्तीर्ण केली असून विविध विषयांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. यात ४६ विद्यार्थ्यांनी ९०%पेक्षा अधिक गुण मिळवले. १६७ विद्यार्थ्यांनी ७५%पेक्षा अधिक गुण मिळवत डिस्टिंक्शन प्राप्त केले. १०० पैकी १०० गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी ४ विद्यार्थी, गणित १ विद्यार्थी, शारीरिक शिक्षण १ विद्यार्थी, व्यवसाय अभ्यास १ विद्यार्थी, अर्थशास्त्र १ विद्यार्थी आहे.

**सीबीएसई दहावी गुणवंत विद्यार्थी**



रोहित यादव ९८.६०%



आदिती राज ९८.००%



अथर्व चव्हाण ९७.८०%

सीबीएसई दहावीला शाळेतून एकूण २९० विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात ९०%पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेले विद्यार्थी ११५, ७५%पेक्षा जास्त गुण (विशेष प्राविण्य) प्राप्त विद्यार्थी २३२ असून विषयवार १०० पैकी १०० गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स १७ विद्यार्थी, डेटा सायन्स २३ विद्यार्थी, विज्ञान ३ विद्यार्थी, गणित १ विद्यार्थी, इंग्रजी २ विद्यार्थी, मराठी १ विद्यार्थी आहेत.

# शिवाजीनगर क्रिकेट अकादमीत आरडीसीए प्रीमियर लीगचा उत्साह

भाजप पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, उलवे मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, उपाध्यक्ष यशवंत साबळे, माजी नगरसेवक गणेश कडू, किशोर पाटील, निलेश खारकर, धीरज ओवळेकर, प्रदीप नाईक, प्रशांत ओक, राजेश पाटील, प्रदीप खलाटे, किरीट पाटील, मनोज लोखंडे, जयंत नाईक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



आरडीसीएच्या माध्यमातून शिवाजी नगर क्रिकेट अकादमीत १२ ते २५ मे या कालावधीत आरडीसीए प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत एकूण आठ संघांनी सहभाग घेतला असून त्यात १६, १९ व २३ वर्षांखालील तसेच सिनियर गटातील खेळाडूंचा समावेश आहे. या स्पर्धेमुळे रायगड जिल्ह्यातील युवा क्रिकेटपटूंना आपली प्रतिभा दाखवण्याची संधी मिळणार आहे.

## निवडक

### मनोरुग्ण महिलेचा शोध

**उरण :** द्रोणागिरी नोड येथून एक मानसिक आजाराने ग्रस्त असलेली ४६ वर्षीय महिला २०२१ मध्ये घरातून फिरायला जाते असे सांगून गेली ती अद्याप परत आली नाही. तिचा शोध न्हावाशेवा पोलीस घेत आहेत. बेपत्ता महिलेचे नाव शोभा आनंद पटेल असे असून तिचा रंग सावळा, उंची चार फूट आठ इंच, बांधा मध्यम, चेहरा उभट, केस काळे, नाक सरळ आहे. अशा वर्णनाची महिला कोणाला सापडल्यास त्यांनी ८६५५३५४११९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पनवेलमधून स्कूटीची चोरी

**पनवेल :** रेल्वे स्टेशन बाहेरील रिक्षा स्टॅण्डच्या जवळ उभी करून ठेवलेली होंडा ॲक्टीव्हा स्कुटी गाडीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे. केतन गोसावी यांची १० हजार रुपये किमतीची काळी होंडा ॲक्टीव्हा स्कुटी (एमएच-०६-एटी-४१५२) उभी केली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### ब्लेडने केले चेहऱ्यावर वार

**पनवेल :** दारु पिण्यासाठी आरोपीने पैसे मागितले असता ते न दिल्याने आपसात संगनमत करून सदर रिक्षा चालकास मारहाण करून तसेच ब्लेडने चेहर्यावर वार करून त्याला जखमी केल्याची घटना रेल्वे स्टेशनच्या आवारात साई मंदिराजवळ घडली आहे. रिक्षा चालक आशिक आलम शेख (३५ रा.नवनाथ झोपडपट्टी) याच्याकडे चार अनोळखी इसमांनी दारु पिण्यासाठी पैसे मागितले असता त्याने त्यास नकार दिल्याने या चौघांनी संगनमत करून त्याला हाता चापट्याने मारहाण करून त्यानंतर ब्लेडने त्याच्या चेहर्यावर वार करून त्याला जखमी केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : अविनाश कोळी यांची भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे भाजप कार्यकर्ते अनिल कोकाटे यांनी अभिनंदन केले.**

# चिरनेरमध्ये वानरांचा उच्छाद



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर या गाव आणि परिसरात जंगली वानरांनी घरांच्या छपरांवर उड्या मारून उच्छाद मांडला असून, ही जंगली वानरे गेल्या अनेक महिन्यांपासून गावात घुसली आहेत. दरम्यान, कळपाने धुडगूस घालणारी ही सात ते आठ वानरे असल्याची माहिती ग्रामस्थांकडून प्राप्त झाली आहे. गावात धुडगूस घालून घरांच्या छपरांचे नुकसान करणाऱ्या या वानरांचा वनविभागाने वेळीच बंदोबस्त करावा अशी मागणी चिरनेर ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे. घरांच्या छपरांवर उड्या मारून ही वानरे घरांचे नुकसान करीत आहेत.

पावसाला सुरुवात व्हायला अवघे काही दिवस उरले असताना, ही जंगली वानरे घरांच्या छपरांवर उड्या मारून पत्रे, कौले फोडत आहेत. त्यामुळे नुकसान तर होत आहेच, परंतु पाऊसही जवळ आल्याने वानरांकडून फोडल्या जाणाऱ्या घरांच्या पत्र्यांच्या व कौलांच्या नुकसानीमुळे येथील नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. उरण तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरणाचे काम सुरू आहे. नवनवीन प्रकल्प या भाग भागात राबविले जात आहेत.

त्यामुळे डोंगर, जंगले आता उध्वस्त होऊ लागली आहेत. त्यामुळे जंगली प्राण्यांनी आपला मोर्चा गावाकडे वळविला आहे. जंगली वानरांच्या उच्छादाला येथील नागरिक कंटाळले आहेत. वनविभागाकडे वारंवार तक्रारी करूनसुद्धा वनविभाग या तक्रारीकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे येथील नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यामुळे येथे नागरिक त्रस्त झाले आहेत. वनविभागाने उच्छाद घालणाऱ्या वानरांचा वेळीच बंदोबस्त करावा अशी मागणी येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# चोरी करणारा अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई पूणे द्रुतगती महामार्गावर धावत्या खासगी ट्रॅव्हल्स बसमधील महिला प्रवाशांची पर्स चोरीतून लाखोंचा मुद्देमाल चोरणार्या चोरट्याला कामोठे पोलिसांच्या पथकाने अखेर अटक करुन त्याची रवानगी तळोजा मध्यवर्ती कारागृहात केली. मूळ गुजरात येथे राहणारा आकाश पटेल असे या ३२ वर्षीय संशयीत चोरट्याचे नाव आहे.

मार्च आणि एप्रिल महिन्यात चार वेगवेगळ्या चोरीच्या घटनांची नोंद महिला प्रवाशांनी कामोठे पोलीस ठाण्यात केली होती. एक सारख्याच पद्धतीने चोऱ्या वाढल्यामुळे कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी चोरट्याला पकडण्यासाठी खास पोलीस पथकाची नेमणूक केली. अथक तपासानंतर अखेर लोणावळा येथील एका हॉटेलमध्ये संशयित थांबल्याची माहिती मिळाल्यानंतर कामोठे पोलिसांनी हॉटेलमधील वेटरचे कपडे घालून सापळा रचला. पहाटे सहा वाजता संशयित आल्यावर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने १५ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरल्याचे कबूल केले. आकाश हा सूरत (गुजरात) येथील बारडोली तालुक्यातील वराड या गावचा मूळ रहिवाशी आहे.

आकाश हा द्रुतगती महामार्गावरील टोलनाक्याच्या काही अंतरापुढे स्वतः चे वाहन बिघडल्याचे सांगून खासगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसला थांबवून त्या बसमध्ये प्रवाशांप्रमाणे चढल्यानंतर सीट मोकळी आहे का हे बघण्याच्या बहाण्याने स्लीपर सीटसमोरील पडदे उघडून झोपलेल्या महिलांच्या पर्स चोरत होता. काही मिनिटांनी तो मागून त्याची मोटार येत असल्याचा बहाणा करुन द्रुतगती महामार्गावरील दुसरा टोलनाका येण्याच्या पूर्वी बसमधून उतरत असे. त्यामुळे तो टोलनाक्यावरील सीसीटिव्ही कॅमेरांमध्ये कैद झाला नाही.

## कामोठे पोलिसांकडून कोंबिंग ऑपरेशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे पोलिसांनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग ऑपरेशन राबवले. १२ मे रोजी सायंकाळी ७ ते १३ मे रोजी मध्यरात्री दीड वाजेपर्यंत कामोठे पोलीस ठाणे हद्दीत छोटा खांदा, मोठा खांदा, कामोठे गाव, जुहू गाव या भागामध्ये कोंबिंग ऑपरेशन राबवण्यात आले. तसेच शिवसेना चौक येथे नाकाबंदी करण्यात आली आणि ऑल आउट दरम्यान कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, चार सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, २३ अंमलदार, झोन टू स्ट्राइकिंग, आरसीपी पथक हजर होते.

या वेळी पोलिसांनी बी एन एस २८७ अंतर्गत दोन आणि बीएनएस २८५ अंतर्गत गुन्हे दाखल केले तसेच देशी दारू विक्री प्रकरणी कारवाई करण्यात आली. चार हिस्ट्रीशीटर चेक केले असता चारही जण मिळून आले. अभिलेखावरील नऊ आरोपी चेक केले असता चार सापडून आले. शिवसेना शाखा चौक येथे नाकाबंदी दरम्यान १२४ वाहने चेक करण्यात आली. यातील २९ वाहनांवर मोटर वाहन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली. परिसरात परकीय नागरिक किंवा बांगलादेशी नागरिक यांचा शोध घेतला, मात्र सापडून आलेले नाहीत. अशाच प्रकारचे कोंबिंग ऑपरेशन यापुढे सुरू राहणार असल्याची माहिती विमल बिडवे, वपोनि यांनी दिली.





**पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते स्वर्गीय दि.बा. पाटील यांच्या कार्याची माहिती शालेय विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयात त्यांच्या प्रतिमेसह त्यांच्या जीवन प्रवासातील महत्त्वपूर्ण घटना आणि कार्याची माहिती विद्यालयाच्या भिंतींवर आकर्षकपणे रेखाटण्यात आली आहे. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी या उपक्रमाची पाहणी करून आढावा घेतला तसेच आवश्यक त्या सूचना केल्या. या वेळी त्यांच्यासोबत दि.बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, सुरेखा मोहकर, प्रभाग १९ चे अध्यक्ष पवन सोनी, महापालिकेचे अधिकारी संजय कटेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.**



**खारघर : पहलगाममध्ये निष्पाप हिंदू नागरिकांच्या भ्याड हत्येला प्रतिसाद म्हणून, पाकिस्तानी दहशतवाद्यांचा खात्मा करताना राष्ट्राचे रक्षण करताना आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूरवीर सैनिकांना श्रद्धांजली वाहण्यासाठी खारघर येथील शिवमंदिर येथे एक विशेष महाआरती आयोजित करण्यात आली होती.**



**कळंबोली : शेतकरी कामगार पक्षामधून भाजपमध्ये नुकतेच प्रवेश कलेले माजी नगरसेवक रवी भगत, माजी नगरसेविका प्रिया भोईर, महिला शहर अध्यक्ष सरस्वती कथारा, कल्पना मोठे यांचे भाजप कळंबोली मंडळ तर्फे स्वागत करण्यात आले.**



**पनवेल : भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष तथा रायगड टेनिस क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष राकेश गायकवाड यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी उलवे मंडळ अध्यक्ष रुपेश धुमाळ, ओवळेचे सरपंच रुपेश गायलवरा, दापोलीचे माजी उसरपंच गजानन पाटील, युवानेते समिर केणी, मनखुश नाईक उपस्थित होते.**

### बेपत्ता महिलेचा शोध

**उरण :** जसखार येथून कोणाला काही एक न सांगता निघुन गेलेली २६ वर्षीय महिला २०२२पासून बेपत्ता आहे. तिचा शोध न्हावाशेवा पोलीस घेत आहेत. बेपत्ता महिलेचे नाव जोनाबावडी काजल मीदया असे असून रंग गोरा उंची अंदाजे पाच फूट, बांधा मध्यम, चेहरा उभट, केस काळे आणि लांब व नाक सरळ आहे. अशा वर्णनाची महिला दिसल्यास त्यांनी ८६५५३५४११९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## एमएनएम कॉलेजचा निकाल ९९.३९ टक्के



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेजचा दहावीचा ९९.३९ टक्के निकाल लागला. जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचा दहावी फेब्रुवारी २०२५ला प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचा एकूण निकाल ९९.३९ टक्के. लागला असून दहावीच्या फेब्रुवारी २०२५ परीक्षेसाठी एकूण १६६ विद्यार्थ्यांपैकी १६५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सुमित सुनील बोर्डे याने ९४ टक्के मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला. कुमार मेघराज सुरेश पाध्ये व हर्षवर्धन धनाजी मोहिते यांनी संयुक्तरित्या ९१.६ टक्के मिळवत द्वितीय क्रमांक प्राप्त केला असून अनघा हेमंत घारे हिने ९१.२ टक्के मिळवत तिसरा क्रमांक प्राप्त केला. शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले, शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर शाळेच्या माजी मुख्याध्यापिका प्रणिता गोळे, पर्यवेक्षक श्री अरुण जोशी, शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# गव्हाण विद्यालयाचा दहावीचा निकाल ९७.२२ टक्के

### दिक्षा वर्तक प्रथम, तर प्रज्ञा पाटील द्वितीय



कु.दिक्षा वर्तक — प्रथम | कु.प्रज्ञा पाटील — द्वितीय | कु.प्रेरणा ब्राम्हणे — तृतीय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून रयत शिक्षण संस्थेच्या गव्हण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजने आपल्या उज्वल निकालाची परंपरा कायम राखत बाजी मारली विद्यालयाचा निकाल ९७.२२ टक्के एवढा लागला आहे. तर गुरुकुल आणि सेमी इंग्रजी विभागाचा निकाल १०० टक्के लागला आहे.


विद्यालयामधील एकूण २१६ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी २१० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात प्रथम वर्तक दिक्षा द्रौपदी रमेश,४९३ गुण (९८.६० %), द्वितीय पाटील प्रज्ञा अश्विनी मनोज, ४५८ गुण (९३ %), तृतीय ब्राम्हणे प्रेरणा प्रज्ञा सारंगधर, गुण ४४८ (८९.६० %) असे विद्यार्थी आहेत.

विद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे,उपप्राचार्य विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

तसेच विद्यालयातील इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक चित्रलेखा पाटील, सागर रंधवे, संदीप भोईर व योगिता पाटील यांचेसह सर्व विषय शिक्षक व त्यांना मार्गदर्शन करणारे विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, माजी उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले व लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांचेही सर्वत्र कौतुक आणि अभिनंदन होत आहे.

दरम्यान, दिक्षा द्रौपदी रमेश वर्तक ह्या इयत्ता दहावी 'ब' गुरुकुल वर्गात शिकणाऱ्या अष्टपैलू गुणावधानी आदर्श विद्यार्थीनीने विद्यालयातून एस.एस. सी.बोर्ड परीक्षेत विक्रमी गुण (९८.६० टक्के) गुण प्राप्त केल्या बद्दल तिचे व कु.प्रज्ञा अश्विनी मनोज पाटील हिने (९३टक्के) गुण प्राप्त केल्याबद्दल विशेष कौतुक व अभिनंदन होत आहे.

## टँकरमधील डिझेलची चोरी



**पनवेल : वार्ताहर**

कर्नाटकातून तळोजा परिसरात माल खाली करण्याकरिता आलेल्या टँकरमधून डिझेलची चोरी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. विजयकुमार अजोरपाल हे ठाणे जिल्ह्यात राहत आहेत. हे कळंबोली येथील टँकर (एमएच ४३ सी.ई १६८८) या गाडीवर टँकर चालक आहेत.

विजयकुमार यांनी बी. पी. कोगनोली, नॅशनल हायवे आप्पाचीवाडी क्रॉस कोगनोली या पंपावर २१८ लीटर डिझेल भरले होते. मँगलोर कर्नाटक राज्यातून तळोजा एम.आय.डी. सी. येथे माल खाली करण्यासाठी आले होते. या वेळी तळोजा एम.आय.डी.सी. येथी एशियन पेंट कंपनीच्या जवळ रात्र झाल्यामुळे ते गाडीतच झोपले. सकाळी उठल्यानंतर डिझेलचा वास येऊ लागल्यामुळे पाहणी केली असता डिझेलची चोरी झाल्याचे लक्षात आले. याबाबतची माहिती त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात दिली आहे.

## संपादकीय

# भारतापुढील संधी कायम


अमेरिकेच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा विराजमान झाल्यापासून अनेक मोठे निर्णय नाट्यपूर्णरित्या घेण्याचा सपाटा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लावला होता. पण कालांतराने ते आपले निर्णय मागे घेतात हेही गेल्या काही दिवसांत अनेकदा दिसले आहे. याच मालिकेतील ताजी माघार म्हणजे चीनवरील सध्याच्या आयातशुल्क आकारणीस ९० दिवसांची स्थगिती देण्याचा निर्णय!

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नाट्यपूर्णरीतीने अफाट आयातशुल्कवाढीची घोषणा करून काही दिवसांपूर्वी जगभराला धक्का दिला होता. यातून अमेरिका आणि चीन या दोन आर्थिक महासत्तांमध्ये व्यापारयुद्ध सुरू झाले व त्यातून जागतिक अर्थव्यवस्था डळमळली. परिणामस्वरूपी जगभरातील प्रमुख शेअर बाजार कोसळले. या निर्णयाचे तितकेच तीव्र चटके खुद्द अमेरिकेतही जाणवतील असे भाकीत अर्थतज्ज्ञांनी तेव्हाच केले होते आणि झालेही तसेच. त्यामुळे अमेरिकेतील उद्योगक्षेत्रातूनच याला विरोध होऊ लागला. या वास्तवाने बहुदा अल्पावधीत ट्रम्प यांना भानावर आणले असावे. त्यामुळेच आता अमेरिका व चीनने आयात शुल्काबाबत सबुरीचे धोरण स्वीकारत दोन पावले मागे येण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. आयातशुल्कवाढीमुळे दोन्ही देशांच्या वस्तूंचा व्यापारच थंडावल्याच्या पार्श्वभूमीवर असा निर्णय घेणे दोन्ही देशांना भाग पडले. अमेरिका व चीन यांच्यातील व्यापारयुद्धातून मार्ग काढण्यासाठी मग जीनिव्हा येथील संयुक्त राष्ट्रांच्या शिष्टमंडळाच्या स्वीस राजदूतांच्या निवासस्थानात दोन दिवसांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीचा रविवारी दुसरा आणि शेवटचा दिवस होता. शनिवारी या चर्चेतून काहीही तोडगा निघाला नव्हता. रविवारी मात्र अखेरच्या क्षणी आयातशुल्क कपातीवर दोन्ही देशांचे एकमत झाले. मग सध्याच्या शुल्क आकारणीस ९० दिवसांची स्थगिती देण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला. त्यामुळे या आर्थिक महासत्तांमध्ये सुरू असलेले व्यापारयुद्ध शमण्याची शक्यता निर्माण झाली आहे. चीनच्या वस्तूंवर आकारण्यात येणारे १४५ टक्के आयातशुल्क अमेरिकेने ३० टक्क्यांवर आणले आहे. तर चीनने अमेरिकेच्या वस्तूंवरील आयातशुल्क ११५ टक्क्यांवरून १० टक्क्यांवर आणण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांनी याबाबत घोषणा केली. म्हणजे शनिवारी संध्याकाळी भारत-पाकिस्तान यांच्यातील शस्त्रसंधीची घोषणा झाली तर पाठोपाठ रविवारी अमेरिका आणि चीनमध्ये सुरू असलेल्या करयुद्धाला तात्पुरता विराम मिळाला. उर्वरित वादग्रस्त मुद्यांवर अमेरिका-चीन यांच्यादरम्यान चर्चा सुरू राहणार आहे असेही सांगण्यात आले. भारत-पाकिस्तान यांच्यामधील शस्त्रसंधी आणि पाठोपाठ अमेरिका-चीनने व्यापारशुल्कात लक्षणीय घट करण्याचा करार जाहीर केल्याने सेन्सेक्स आणि निफ्टी या आपल्याकडील शेअरबाजारांच्या प्रमुख निर्देशांकांनी उत्साह उधाणल्याने एका सत्रातील सर्वात मोठी मुसंडी सोमवारी नोंदवली. तब्बल पावणेचार टक्क्यांनी उसळलेल्या निर्देशांकांमुळे गुंतवणूकदारांना त्यांच्या संपत्तीत १६.१५ लाख कोटींची श्रीमंती अनुभवता आली. अमेरिका आणि चीनच्या या निर्णयामुळे जगभरावरील व्यापारयुद्धाचे सावट दूर होताना दिसते आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत पुन्हा एकदा स्थैर्य निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. चीनलाही यातून दिलासा मिळाल्याने, या दोघांमधील व्यापारयुद्धातून भारताला निर्माण झालेली संधी आता नाहिशी होईल का असा प्रश्न विचारला जातो आहे. तर त्याचे उत्तर नकारार्थी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. अनेक बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्यांनी यापूर्वीच भारतात मोठी गुंतवणूक केली आहे. टेस्लासारख्या सध्या बहुचर्चित असलेल्या कंपन्याही भारतात प्रवेश करण्यास उत्सुक आहेत. विदेशी गुंतवणूकदारांनाही भारतातील स्थैर्य आकर्षित करते आहे. एकंदर या बदललेल्या परिस्थितीतही भारतासमोरील संधी कायमच आहे.**

# ज्येष्ठ निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी

ज्येष्ठ निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी याचे मूळ नाव दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी आहे. त्यांचा जन्म १४ मे १९५१ रोजी झाला. ते महाराष्ट्रातील एक भारतीय समाजसेवक आहेत. आप्पासाहेब धर्माधिकारी हे नानासाहेब धर्माधिकारी यांचे पुत्र आहेत. नानासाहेब यांच्या पावलावर पाऊल टाकत आप्पासाहेब हे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, निशुल्क रक्तदान शिबिर, रोजगार मेळावे, स्वच्छता मोहीम, अंधश्रद्धा निर्मूलन, अनेक व्यसनमुक्ती केंद्र इत्यांदी कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले. २०१४मध्ये मध्ये डी. वाय. पाटील विद्यालय नेरुळ यामध्ये त्यांना विद्यालंकार ही पदवी देऊन त्यांना सन्मानित केले होते. २०१७ यामध्ये ते सर्वोच्च भारतीय नागरी सन्मान पुरस्कार पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले.

आप्पासाहेब धर्माधिकारी हे रायगड जिल्ह्यात समाजसेवेचे काम करत असून जेष्ठ निरूपकार म्हणून ओळखले जातात. राज्यभरात लाखोंच्या संख्येने त्यांचे अनुयायी असून रेवदंडा या त्याच्या कर्मभूमीत नेहमीच गर्दी असते. आप्पासाहेब धर्माधिकारी हे महाराष्ट्रातील ओळखले जाणारे महत्वाचे समाजसेवक आहेत. अनेक राज्यातील पक्षातील नेते त्यांना आणि त्याच्या कुटुंबाना गुरू मानतात. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही ते गुरू आहेत. त्यांच्यासह अनेक मान्यवर व्यक्ती आप्पासाहेब यांना आपले गुरू मानून त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी रेवदंडा येथील निवासस्थानी भेट देत असतात.



अलीकडच्या काळातील मोठ्या सामाजिक परिवर्तनाच्या यशस्वी चळवळीचे प्रत्यंतर देत आले आहे. धर्माधिकारी घराण्यात चारशे वर्षांपासून समाजप्रबोधनाच्या कार्याची परंपरा आहे.

आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे वडील नानासाहेब धर्माधिकारी हेसुद्धा समाजसेवक होते. धर्माधिकाऱ्यांच्या घरामध्ये ही परंपरा चारशे वर्षांपासून चालू आहे. नानासाहेब धर्माधिकारी याना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार, शिवराज प्रतिष्ठान पुरस्कार, महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार अश्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे आणि त्यांना मरणोत्तर महाराष्ट्र भूषण या पुरस्काराने देऊन सन्मानित करण्यात आले. जेव्हा हा पुरस्कार त्यांना देणार होते त्या वेळी खारघर येते ५१०एकरच्या जमिनीत चाळीस लाखांहून अधिक लोक जमा झाले होते. या गर्दीची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड यामध्ये झाली आहे.

### वृक्ष लागवडीमध्ये पुढाकार

हवामानातील बदल आणि त्याचे तापमानावर होणारे परिणाम लक्षात घेऊन वृक्षलागवड करून त्यांची जोपासना करण्याचे कार्य नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने हाती घेण्यात आले. प्रतिष्ठानच्या वतीने २०१५ ते २०२१ या कालावधीत एकूण ३६ लाख ६१ हजार ६११ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. तीन लाख २१ मनुष्यबळ वापरण्यात आले. या वृक्षांची जोपासनाही श्री सदस्यांकडून केली जात आहे. आंतरिक स्वच्छतेबरोबर परिसर स्वच्छतेला महत्त्व द्यायला हवे, अशी शिकवण अप्पासाहेबांनी आपल्या अनुयायांना दिली. या शिकवणीतून नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली. रस्ते, नाले, गाळाने भरलेले तलाव, समुद्र किनारे यांची स्वच्छता करण्याचे कार्य श्री सदस्यांनी हाती घेतले. गावाच्या वेशीपासून सुरू झालेला हा उपक्रम हळुहळू शहरांच्या चौकाचौकांपर्यंत येऊन पोहचला. प्रतिष्ठानच्या वतीने आत्तापर्यंत १४० स्वच्छता अभियाने राबविण्यात आली. २० लाख २३ हजार ३६९ श्री सदस्य सहभागी झाले. एक लाख १५ हजार २३ टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या शिवाय विहिरीचे पुनर्भरण, जलस्रोतांची स्वच्छता, निर्माल्य संकलनातून खत निर्मितीचे उपक्रम राबविले आहेत. आध्यात्माला सामाजिक उपक्रमांची जोड दिल्याने लाखो अनुयायी त्यांच्या कार्यात जोडले गेले आहेत.

### मिळालेले पुरस्कार

आप्पासाहेबांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना डी. वाय. पाटील विद्यापीठाने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. माजी राज्यपाल विद्यासागर राव यांनी त्यांची राज्याचे स्वच्छतादूत म्हणून नियुक्ती केली होती, तर २०१७मध्ये केंद्र सरकारने पद्मश्री हा नागरी सन्मान देऊन सन्मानित केले. युरोपियन इंटरनॅशनल इन्स्टिट्युटने अप्पासाहेबांना लिव्हिंग लिजंड पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांच्या या कारकिर्दीची दखल घेऊन राज्य सरकारने गेल्या वर्षी त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित केले. **(साभार : इंटरनेट)**

# स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा आपल्या खांद्यावर समर्थपणे वाहिली ती छत्रपती संभाजीराजे यांनी आज छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाच्या जशा अनेक गाथा सांगितल्या जातात; त्याचप्रमाणे एका गद्दार व्यक्तीमुळे त्यांचा दुर्दैवी अंत झाला.

छत्रपती संभाजीराजे औरंगजेबाच्या तावडीत जिवंत सापडले आणि त्यांनी धर्म परिवर्तनाला नकार दिल्यामुळे औरंगजेबाने त्यांचे केलेले हाल आणि त्यांची हत्या याबद्दल हळहळ व्यक्त केली जाते, मात्र या महापराक्रमी व्यक्तीने आपल्या जेमतेम नऊ वर्षांच्या स्वराज्याच्या कारकीर्दीत मोगल, गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना चांगलंच जेरीस आणल होते.

संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. संभाजीराजांच्या आईसाहेब सईबाईंचं अकाली निधन झालं. त्यानंतर माता जिजाऊंनी संभाजी महाराजांच्या पालनपोषणाकडे लक्ष दिले. जिजाऊंसोबत पुण्याजवळील कापूरहोळ येथील धाराऊ नावाच्या महिलेने महाराजांचे संगोपन केले.

वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी संभाजी महाराज स्वराज्याचे युवराज



तर केवळ २३व्या वर्षी स्वराज्याचे छत्रपती झाले. राजकारण अगदी कमी वयातच शिकण्याची संभाजी महाराजांची जबरदस्त इच्छा होती. त्यामुळे त्यांनी मुघल दरबार आणि तिथं होणारं राजकारण कसं असतं हे अगदी बालपणीच पाहिलं होतं.

केवळ चौदाव्या-पंधराव्या वर्षी संभाजी राजांनी साहित्य, कविता यांच्यात रस घेतला आणि याच काळात छत्रपती संभाजी महाराज संस्कृत पंडित झाले. बुधभूषणम या संस्कृत ग्रंथासह इतर भाषेतले तीन ग्रंथही छत्रपती संभाजी महाराज यांनी लिहिले.

छत्रपती शिवाजी महाराजांसोबत वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी संभाजीराजे आग्र्याला गेले. त्यानंतर आग्र्याहून सुटकेचा एकएक क्षण त्यांनी आपल्या पित्यासोबत अनुभवला. आग्रा येथून सुटका करून घेऊन शिवाजी राजे मजल दरमजल करत राजधानीत परतले, पण सुरक्षिततेसाठी संभाजीराजांना काही काळ मथुरेत ठेवण्यात आलं होतं.

शिवरायांचे स्वराज्याचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी संभाजीराजे महाराजांच्या मृत्यूनंतर नऊ महिन्यांनी छत्रपतींच्या गादीवर विराजमान झाले. रायगडावरच संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. १६ जानेवारी १६८१ रोजी महाराष्ट्रातील रायगड किल्ल्यावर छत्रपती संभाजींचा भव्य राज्याभिषेक झाला. अशा या शूर राजाचे ११ मार्च १६८९ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# गूगलच्या लोगोमध्ये तब्बल १० वर्षानंतर मोठा बदल

आघाडीचे सर्ज इंजिन म्हणून ओळखले जाणाऱ्या गुगलने त्यांच्या आयकॉनिक 'G' लोगो बदलला आहे. जवळपास १० वर्षानंतर गुगलने त्यांचा लोगो बदलला आहे असे सांगण्यात येत आहे.



नवीन डिझाइनमध्ये लाल, पिवळा, हिरवा आणि निळा या चार रंगांच्या ब्लॉक्सपासून दूर जाऊन त्यांची जागा एका ग्रेडियंट इफेक्टने घेतली आहे. या छोट्याश्या बदलाचा उद्देश नवीन आयकॉनला एक फ्रेश, नवीन स्वरूप देणे आणि गुगल AI वर सतत लक्ष केंद्रित करतो आहे हे अधोरेखित करत आहे.

हे वाचताच सर्वात आधी तुम्ही क्रोमवर सर्च करून लोगोत काय बदल झाला हे पहिले असेल. तर ९to५Google च्या अहवालानुसार हे अपडेट सध्या गुगल सर्च पद्वारे आयओएस युजर्ससाठी आणलं जाणार आहे. गुगलच्या ॲपच्या बीटा आवृत्ती १६.१८मध्ये आणि iOS युजर्ससाठी गुगल सर्च ॲपद्वारे हे अपडेट रोल आउट होत आहे. तुम्ही खाली दिलेल्या पोस्टमध्ये अगदी बारकाईने पाहिल्यास गूगलच्या लोगोचा रंग बदलण्यात आला आहे ; जो त्याच्या अलीकडील AI ड्रिव्हन उपक्रमांशी सुसंगत आहे.

गुगल वर्डमार्कमध्ये अद्याप कोणतेही बदल झालेला नाही. कंपनीने अद्याप मुख्य गुगल वर्डमार्कमध्ये कोणतेही बदल केलेले नाहीत. क्रोम किंवा मॅप्स सारख्या इतर उत्पादन लोगोमध्येही असेच अपडेट्स येतील की नाही याची अधिकृत माहिती सध्या समोर आलेली नाही. पण गुगलने त्यांच्या उत्पादनांमध्ये एआयवर भर दिल्याने भविष्यात ग्रेडियंट इफेक्ट इतर सेवांमध्ये सुद्धा वापरले जाऊ शकते, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे.

२०१५नंतर गुगलने पहिल्यांदाच आपला G लोगो अपडेट केला आहे. कंपनी अधिक एआय फीचर्सचा समावेश करत असताना, नवीन ग्रेडियंट इफेक्टने त्याची विकसित होत असलेली ब्रँड ओळख अधोरेखित करते, विशेषतः गुगल जेमिनी, त्याचा जनरेटिव्ह एआय असिस्टंट लाँच केल्याने जेमिनीच्या लोगोमध्ये आधीच निळा ते जांभळा ग्रेडियंट इफेक्ट समाविष्ट आहे; यामुळे गुगलच्या एकूणच व्हिज्युअल आयडेंटिटीमध्ये ग्रेडियंट डिझाइनचा ट्रेंड स्पष्टपणे दिसतो आहे आणि आणि आता हा नवीन बदल कंपनीच्या AI केंद्रित भविष्याकडे दिशा दर्शवतो आहे.

# ज्येष्ठ समाजसेविका डॉ. इंदूताई पटवर्धन

समाजाने दूर अंधःकारात लोटलेल्या कुष्ठरोग्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ समाजसेविका, राजकुमारी डॉ. इंदुताई पटवर्धन यांचा आज जन्मदिन. त्यांचा जन्म जमखिंडीच्या राजघराण्यात १४ मे १९२६ रोजी झाला.

इंदुताईंचे शिक्षण जमखिंडी व कोल्हापूर येथे झाले. राजकुमारी म्हणून जन्मलेल्या इंदूताईंनी १६व्या वर्षी गांधीजींच्या चळवळीस वाहून घेतले. मॉंटेसरी शिक्षणक्रम पूर्ण करून त्या सेंट कोलंबो स्कूलमध्ये शिक्षिका बनल्या. पुढे ब्रिटिश इंडियन रेड क्रॉस आणि सेंट जॉन ॲम्ब्युलन्सच्या कामामध्ये दाखल झाल्या. दुसऱ्या महायुद्धातल्या प्रत्यक्ष युद्धभूमीवर जखमी लष्करी जवानांचे शुश्रुषेसाठी ब्रह्मदेश, जावा येथे गेल्या. सिंगापूर, जपान, येथेही त्यांनी काम केले. वर्ष १९५३ मध्ये सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी होमिओपॅथीचे शिक्षण घेतले. खेड शिवापूर येथे दवाखाना सुरू केला. पूना विमेन्स काउंसिलचे कामही त्या करीत होत्या. पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशनच्या त्या संस्थापक सदस्या होत्या. लष्करातील जवान व आदिवासी समाजातील आजारी, जखमी रुग्णांची सेवा करत त्यांनी आपले आयुष्य अर्पण केले. त्यासाठी त्या जन्मभर अविवाहित राहिल्या.



### निमित्त

मुंबई इलाख्यात आपले जमखंडी संस्थान विलीन करणारे त्यांचे भाऊ राजा परशुराम शंकरराव पटवर्धन हे भारतीय राजघराण्यांपैकी पहिले संस्थानिक होते. पुणे येथील पूना कॉलेजला सर परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या स्मरणार्थ दोन लाख रुपये इतकी देणगी त्यांनी दिली होती व तेव्हापासून ते कॉलेज सर परशुरामभाऊ कॉलेज (एस. पी. कॉलेज) म्हणून ओळखले जाऊ लागले.

ऑक्सफॉम या संस्थेकडून १९६१ साली मिळालेल्या १७ हजार रुपयांच्या मदतीवर पुण्याजवळच्या डुडळगाव येथील एका ओसाड जागेवर आनंदग्राम' नावाने कुष्ठरोग्यांची वसाहत उभी केली. पश्चिम महाराष्ट्रात पुण्याजवळ कुष्ठरोग सेवाकेंद्र सुरू करणाऱ्या त्या पहिल्या महिला कार्यकर्त्या आहेत. वर्ष १९६५मध्ये महाराष्ट्र शासनाचा भिक्षा प्रतिबंध कायदा अमलात आल्यावर त्यांनी ८० रुग्णांसह कुष्ठरोग्यांसाठी प्रत्यक्षात वर्ष १९६५मध्ये काम सुरू केले. आळंदी जवळच्या सध्याच्या आनंदग्राम' येथे वर्ष १९७० मध्ये त्यांनी स्थलांतर केले.

उला लेडी हाइड पार्कर, राधा रमणजी अशा व्यक्तींच्या सहाय्यामुळे आनंदग्राम'ला सध्याचे विशाल स्वरूप आल्याचा त्या कृतज्ञतेने उल्लेख करतात. सध्या आश्रमात राहणाऱ्यांकडून येथे शेती, कुक्कुटपालन, गोपालन, कापड उद्योग आदी अनेक उपक्रम यशस्वीपणे चालविले जातात. रेशमासाठी तुती इत्यादीची लागवड केली जाते. मुला-मुलींनी फुलून आलेल्या शाळा, शेतीला नियोजन करून दिलेले पाणी, सदैव कार्यरत असलेले हात, हे आनंदग्रामचे आजचे आदर्शवत ठिकाण झाले आहे. खाद्यतेल सोडले तर सर्व काही इथेच बनते, धान्य पिकते, हातमागावर कपडे तयार होतात, दवाखाना, केशकर्तनालय इथे आहे. गोबर गॅस बनतो. इतके स्वयंपूर्ण गाव येथे त्यांनी उभे केले.

इंदुताई पटवर्धन यांच्या कार्याची दाखल घेऊन शासनाने त्यांना दलितमित्र हा पुरस्कार दिला. ८ फेब्रुवारी १९९९ रोजी त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# रात्री न जेवल्याने खरंच वजन कमी होतं का?

खाण्याची इच्छा नसेल किंवा बाहेरून काहीतरी खाऊन आल्यामुळे आपल्यापैकी बरेच जण रात्रीचे जेवण तर कंटाळा करून सकाळचा नाश्ता स्किप करतात, पण नाश्ता किंवा रात्रीचे जेवण स्किप करणे ही गोष्ट चांगली आहे का?



तर मल्हार गानला यांच्या मते, नाश्ता वगळण्यापेक्षा रात्रीचे जेवणच करू नका, पण नाश्ता स्किप करणे थांबवू नका, कारण त्याचा काही उपयोग नाही. यामुळे तुमचे शरीर भुकेने जागे होईल. रात्रीच्या जेवणानंतर ८-१० तास काहीच न खाल्ल्यामुळे तुमच्या रक्तातील साखर कमी होईल. त्यामुळे शरीरात ऊर्जा उपलब्ध राहत नसल्यमुळे दुपारी १ वाजेपर्यंत पॅनिक व्हाल. त्यानंतर संध्याकाळी ५ आणि त्यानंतर ८ वाजता पुन्हा पॅनिक व्हाल. त्यानंतर रात्री जेवणात जास्त प्रमाणात खाल्ल्याने नुकसान सुद्धा होईल म्हणजेच दिवस जसजसा पुढे जाईल, तसतशी चिंता वाढत जाईल आणि शेवटी रात्री जेवणात तुमच्याकडून जास्त प्रमाणात खाल्लं जाईल आणि तिथून खरी समस्या निर्माण होईल.

नाश्त्यापेक्षा रात्रीचे जेवण स्किप करणे चांगले आहे की, नाही याबद्दल जाणून घेण्यासाठी अपोलो स्पेक्ट्रा हॉस्पिटलच्या वरिष्ठ पोषणतज्ज्ञ दिव्या मलिक यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी सांगितले की, नाश्त्याऐवजी रात्रीचे जेवण वगळल्याने संभाव्य फायदे देऊ शकतात, पण ही गोष्ट पूर्णपणे व्यक्तीच्या जीवनशैलीवर, आरोग्य स्थितीवर आणि दैनंदिन दिनचर्येवर अवलंबून असते.

नाश्ता हा दिवसाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणून ओळखला जातो, कारण नाश्ता चयापचय सुरू करण्यासाठी आणि रात्रभर उपाशी राहिल्यानंतर शरीराला आवश्यक ऊर्जा प्रदान करतो. नाश्ता न केल्याने थकवा, एकाग्रता कमी होणे आणि दिवसाच्या उत्तरार्धात भूक वाढते; ज्यामुळे अनेकदा अस्वस्थ अन्न निवडी होतात. याउलट रात्रीचे जेवण वगळल्याने कॅलरीजचे प्रमाण कमी होण्यास आणि पचन सुधारण्यास मदत होते, कारण रात्री उशिरा जेवल्याने वजन वाढणे, ॲसिड रिफ्लक्स आणि झोपेची गुणवत्ता खराब होण्यास मदत होते, पण तरीही प्रत्येकाने रात्रीचे जेवण वगळू नये, असा सल्ला दिव्या मलिक यांनी दिला आहे.

जे लोक इंटरमिटेंट फास्टिंग उपवास करतात किंवा वजन नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. फक्त त्यांच्यासाठीच रात्रीचे जेवण न करणे फायदेशीर ठरू शकते, पण पोषक तत्वांची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी डॉक्टरांकडून योग्य ते मार्गदर्शन घेतले पाहिजे.

# खोपोलीत सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरवस्था

**खोपोली : प्रतिनिधी**

बारा वर्षांपूर्वी एमएमआरडीएच्या विशेष निधीतून खोपोली नगरपालिका क्षेत्रातील विविध प्रभागात एकूण दहा सार्वजनिक स्वच्छता गृहांची निर्मिती करण्यात आली, मात्र वेळोवेळी रंगरंगोटी, डागडुजी, दुरुस्ती अभावी या स्वच्छता गृहांची दुरवस्था झाली आहे.



यातील सोमजाई वाडी सह अन्य दोन ठिकाणाची स्वच्छता गृहांची पडझळ होऊन याठिकाणी नव्याने बांधकाम करण्यात आले आहे. तर उर्वरीत ठिकाणी मात्र दुरावस्थेत असलेल्या स्वच्छता गृहांची धोकादायक असूनही वापर सुरू आहे.

एकाच संकुलात महिलासाठी व पुरुषांसाठी वेगवेगळ्या स्वरूपात या स्वच्छता गृहांची निर्मिती करण्यात आली होती, मात्र कधी पाण्याचा अभाव, अंतर्गत साफसफाई बाबत दुर्लक्ष व रंगरंगोटी सहित वेळोवेळी दुरुस्ती व डागडुजी होत नसल्याने शहरातील ही सार्वजनिक स्वच्छता गृह अखेरची घटका मोजत आहेत. एका बाजूला स्वच्छता सर्वेक्षण अभियान अंतर्गत मोठ्या प्रमाणावर नवीन कामे सुरू आहेत, मात्र बारा वर्षांपूर्वी उभारण्यात आलेली सर्व सार्वजनिक स्वच्छता गृह मात्र दुर्लक्षित बनले आहेत. यातील अनेक स्वच्छता गृह संकुले असुरक्षित व धोकादायक बनले असल्याने, त्यांचा उपयोग जवळपास बंद पडला असल्याचे चित्र आहे.

याबाबत सर्वसामान्य गरीब नागरिकांत पालिका स्वच्छता व बांधकाम विभागाबाबत मोठी नाराजी असून एकीकडे स्मारके व अन्य मोठमोठे उपक्रम राबविण्यात येत असताना सार्वजनिक स्वच्छता गृहांची देखभाल बाबत नगरपालिका प्रशासन अत्यंत उदासीन असल्याचे चित्र आहे.

**स्वच्छता सर्वेक्षण अभियान अंतर्गत शहरातील सर्वच सार्वजनिक स्वच्छता गृहांची दुरुस्ती, रंगरंगोटी व डागडुजी करण्याचा प्रस्ताव आहे. नियमितपणे पाणीपुरवठा, साफसफाई व दिवाबत्ती ही सुधारण्यात येणार आहे.**

**–डॉ. पंकज पाटील,**
**मुख्याधिकारी, खोपोली**

# वन विभागाच्या कारवाईत खैराची लाकडे जप्त

**माणगाव : बातमीदार**

माणगाव वनपरिक्षेत्रात वनविभागाने गुप्त माहितीवरून चकित करणारी आणि परिणामकारक कारवाई रविवारी (दि.११) केली आहे. उपवनसंरक्षक रोहा डॉ. शैलेंद्रकुमार जाधव व सहा. वनसंरक्षक रोहित चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत शिंदे आणि त्यांच्या पथका वैशाली भोर, अनिल मोरे, किरण जाधव आणि पवन चौधरी यांच्यासह ही कारवाई केली.



मिळालेल्या गुप्त बातमीवरून माणगाव येथील मन मंदिर स्वीटजवळ टाटा ट्रक (डीएन ०९ आर ९०४७)ची तपासणी करण्यात आली. तपासणीत ट्रकमध्ये २०.०५६ घनमीटर खैर लाकूड (सोलीव माल) आढळून आला, ज्याची अंदाजे किंमत १,०५,३०८ रुपये आहे. हे लाकूड कोणतीही कायदेशीर परवानगी नसताना वाहतूक केली जात असल्याचे स्पष्ट झाले. संबंधित ट्रकची अंदाजे किंमत ८,००,००० रुपये असून, एकूण ९,०५,३०८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत कलम ४१(२)(ब) आणि ४२ अन्वये वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित आरोपी १) रियाज हुसेन (वय ४१ वर्ष, रा. उत्तर प्रदेश) व २) रहिम फईम खान (वय २२ वर्ष, रा. उत्तर प्रदेश) या दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास उपवनसंरक्षक डॉ. जाधव व सहा. वनसंरक्षक श्री. चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी माणगाव प्रशांत शिंदे, माणगाव व वनपाल मानगाव ज्ञानदेव सुभेदार करीत आहेत.

# खालापूरात आज आपत्ती व्यवस्थापन शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर येथील सर नेताजी पालकर सभागृहात बुधवारी (दि.१४) एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

पावसाळा सुरू होत आहे, खालापूर तालुक्यात दरड प्रणव क्षेत्र आहे, इरसाल वाडी दुर्घटनादेखील घडली आहे. पावसाळ्यात पूर सदृश परिस्थिती निर्माण होते पाताळ गंगा नदीला पूर येतो. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्यासाठी एक दिवसीय आपत्ती व्यवस्थापन शिबिर खालापूर तहसील आवारातील नेताजी पालकर सभागृहात १४ मे रोजी आयोजित करण्यात आले आहे. आपदा मित्र, सखी सर्व, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, तालुक्यातील सर्व सरपंच, गाव पोलीस पाटील, महसूल सेवक यांनी या प्रशिक्षणाला उपस्थित राहायचे आहे. सकाळी १०.३० ते ५.०० वाजेपर्यंत हे शिबिर आहे, असे तहसीलदार अभय चव्हाण यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रात माहिती देण्यात आली असून या शिबिराला उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे.

# ‘आमदार महानाट्य करंडक’चा शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसानिमित्त कलारंग सांस्कृतिक सामाजिक संस्था अलिबाग यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने आयोजित आमदार महानाट्य करंडक २०२५ या दोनअंकी नाट्य स्पर्धेचा शुभारंभ भाग्यलक्ष्मी सभागृह येथे करण्यात आली.



या वेळी आमदार महेंद्र दळवी, माजी जि. प. सदस्या मानसी दळवी, कामगार नेते दीपक रानवडे, सिने नाट्य अभिनेते व स्पर्धेचे परीक्षक अनिल गवस व भरत सावळे, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते अनंत गोंधळी, सुरेश म्हात्रे, संजीवनी नाईक, ॲड. प्रसाद पाटील, संदीप गोठीवरेकर, रमेश धनावडे, आनंद कोळगावकर, कलारंगचे अध्यक्ष प्रकल्प वाणी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना ॲड. प्रसाद पाटील यांनी शहरांमध्ये प्रथमच ग्रामीण कलाकारांसाठी आयोजित होणारी स्पर्धा हे विशेष आहे असे सांगितले. स्पर्धेतील पहिल्या नाटकाची पहिली पहिली घंटा मानसी दळवी तदनंतर दुसरी घंटा संस्थेचे अध्यक्ष प्रकल्प वाणी व तिसरी घंटा आमदार महेंद्र दळवी व परीक्षक अनिल गवस यांच्या शुभहस्ते देण्यात आली. व लगेचच मोरया क्रिएशन, चौल निर्मित आत्या आत या या नाटकाच्या प्रयोगाला सुरुवात झाली. व सायं. खिडकी पंचक्रोशी नाट्य मंडळ प्रस्तुत देव दरीच हाय..! हे नाट्य सादर झाले.

ही स्पर्धा ११ ते १५ मे या कालावधीमध्ये संपन्न होणार असून दर दिवशी दोन नाटक व अंतिम दिवशी एक नाटक व सायंकाळी पारितोषिक वितरण सोहळा होणार आहे.

# दहावीत रायगडचा निकाल ९६.२५ टक्के

**अलिबाग : प्रतिनिधी**

इयत्ता दहावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा निकाल ९६.२५ टक्के लागला. यंदाही उत्तीर्ण होण्यात मुलींनी बाजी मारली आहे. जिल्ह्यातील रोहा तालुक्याचा निकाल सर्वाधिक ९७.१२ टक्के, तर सुधागड तालुक्याचा सर्वात कमी ९१.२८ टक्के निकाल लागला.



जिल्ह्यात दहावीच्या परीक्षेसाठी ३५ हजार ६१२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. ३५ हजार ३९४ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. त्यापैकी ३४ हजार ६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. म्हणजे ९६.२५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यंदाही मुलींनी निकालात बाजी मारली. मुलांच्या तुलनेत मुली उत्तीर्ण होण्याचे प्रमाण अधिक राहिले. ९७.२६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या, तर ९५.३१ टक्के मुले उत्तीर्ण झाले आहेत.

१८ हजार ४९९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. १८ हजार ३३८ परीक्षेला बसले. त्यातील १७ हजार ५५० उत्तीर्ण झाले, तर १७ हजार ११३ मुलींनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. १७ हजार १६ मुली परीक्षेला बसल्या होत्या. त्यापैकी १६ हजार ५५० मुली उत्तीर्ण झाल्या.

**तालुकानिहाय निकाल (टक्क्यांमध्ये)**

रोहा ९७.१२, महाड ९७.०७, पनवेल ९६.८८, अलिबाग ९६.७६, कर्जत ९६.६८, माणगाव ९६.४८, तळा ९६.४०, मुरूड ९६.१९, श्रीवर्धन ९५.८३, उरण ९५.७८, पेण ९५.४९, म्हसळा ९५.५३, पोलादपूर ९५.०७, खालापूर ९३.७५, सुधागड ९१.२८

**सीबीएसई बोर्डाचाही निकाल जाहीर**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) बारावीनंतर दहावीचा निकालही मंगळवारी (दि. १३) जाहीर केला. या निकालात ९३.६० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या वर्षीपेक्षा उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ०.०६ टक्क्याने वाढले आहे.

यंदाच्या सीबीएसई दहावी परीक्षेसाठी एकूण २६,६७५ शाळांमधून एकूण २३ लाख ७२ हजार ९३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी २२ लाख २१ हजार ६३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गेल्या वर्षी एकूण ९३.६० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. यंदा वर्षी ९३.६६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गेल्या वर्षीपेक्षा उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ०.०६ टक्क्याने वाढले आहे. मुलींनी मुलांपेक्षा २.३७ टक्क्यांपेक्षा जास्त गुणांनी आघाडी घेतली आहे. एकूण ९५ टक्के मुलींनी परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

# खोपोलीत आंबा बाजार तेजीत; मोठ्या प्रमाणावर विक्री

**खोपोली : प्रतिनिधी**

एप्रिल महिन्यात आंबा सिजन सुरू झाल्यापासून जून महिन्याच्या मध्यापर्यंत खोपोलीतील बाजारपेठमधील हनुमान मंदिर परिसरात खास आंबा बाजार लागतो. सकाळी पाच वाजल्यापासून साधारण अकरा वाजेपर्यंत येथील आंबा खरेदी विक्री व्यवहार चालतात. कर्जत, पेण, अलिबाग, राजापूर, रत्नागिरी सहित गुजरात बलसाड व कर्नाटक हापूस आंबा येथे मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी उपलब्ध असतात.

यावर्षी अलिबाग व पेण तालुक्यातील वरसई भागातील हापूस व केशर आंबा मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी दाखल होत असून रत्नागिरी पाठोपाठ स्थानिक हापूस आंब्याला नागरिकांची पसंती मिळत असल्याने हा आंबा भाव खाऊन जात आहे. येथे आंब्याचे किरकोळ व होलसेल असे दोन दर असतात. त्यातही आकारा नुसार दर निश्चित आहेत. कच्च्या आंब्याचे किरकोळ विक्रीसाठी २०० पासून ३०० प्रति डझन तर पिकलेल्या आंब्यासाठी २०० ते ३५० प्रति डझन असे दर आहेत. चार डझन व त्यावरील होलसेल खरेदीसाठी कच्च्या आंब्याचे दर १८० ते ३०० रुपये प्रति डझन तर पिकलेल्या आंब्यासाठी हे दर १५० पासून ३०० प्रति डझन असे आहेत.

होलसेल खरेदीसाठी अलिबाग तालुका व पेण तालुक्यातील वरसई भागातील कच्च्या आंब्याला मोठी आवक होत असल्याने खरेदीसाठी नागरिकांचीही पसंती मिळत आहे. मागील आठवड्यापासून येथील हनुमान मंदिर आंबा बाजारात सकाळी पाच ते आठ वाजेपर्यंत दररोज आंबा खरेदी व विक्रीसाठी मोठी गर्दी होत असून या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत आहे.

या आंबा बाजारातून होलसेल खरेदी करून स्थानिक गरजू कुटूंब खासकरून महिला वर्ग शहरातील गल्ली गल्ली व रहिवासी सोसायटयांमध्ये जाऊन माफक नफा कमवून आंबा विक्री करतात. या माध्यमातून दोन महिने त्यांना रोजगार उपलब्ध होत असतो. दरम्यान, अवकाळी पावसाचे वातावरण निर्माण झाल्याने आंबा बागायतदार व व्यावसायिक चिंतेत सापडले असल्याने, मिळेल त्या दरात आंबा बाजारात विक्रीसाठी उपलब्ध केला जात असल्याने, ग्राहकांना माफक दरात आंबा खरेदी करता येत आहे, मात्र मागील दोन दिवस वादळी वारा मुळे मोठ्या प्रमाणावर पडझड झाली असल्याने आंबे खराब होण्याचे प्रमाण ही वाढले आहे.




# दामत गावात यापुढे गोहत्या बंदी!

## ‘त्या’ प्रकरणानंतर नागरिकांचा मोठा निर्णय

**नेरळ : प्रतिनिधी**

गोहत्या रोखण्यासाठी दामत गावातील मुस्लिम समाजाने एक मताने मोठा निर्णय घेतला असून याबाबत तशी माहिती प्रसार माध्यमांना दिली आहे. यासाठी सर्वप्रथम मुस्लिम समाजाने कर्जत उपविभागीय पोलिस अधिकारी आणि नेरळ पोलीस यांची भेट घेतली आहे. समस्त दामत गावातील मुस्लिम बांधवानी हा निर्णय घेतला असून तशा ठराव सरपंच यांच्याकडे देण्यात येणार आहे. एक कमिटीदेखील यासाठी तयार करण्यात येणार असल्याची माहिती ग्रामस्थांच्या वतीने अजगर खोत यांनी प्रसार माध्यमांना दिली आहे.



कर्जत तालुक्यातील नेरळ पोलीस ठाणे हद्दीत येत असलेल्या दामत गावात दोन दिवसांपूर्वी गोहत्या रोखण्यासाठी गेलेल्या गोरक्षक हिंदू तरुणांमध्ये आणि गावातील मुस्लिम समाजा मध्ये पोलिसांसमोर तणाव वाढला होता. पोलिसांनी केलेल्या हस्तक्षेपणानंतर काहीसा तणाव कमी झाला, मात्र नेहमीच या गावात गोहत्या होत असून यावर कारवाई होत नसल्याचा आरोप गोरक्षकांकडून केला जातो. त्यातच आता येथील मुस्लिम समाजाच्या वतीने गावात कुठल्याही प्रकारची गोहत्या होणार नाही म्हणून पुढाकार घेण्यात आला आहे.

या वेळी दामत गावातील मुस्लिम बांधवानी नेरळ पोलीस ठाण्यात भेट दिली असून कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी डी डी टेळे आणि नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांच्याशी चर्चा केली आहे. यासाठी लवकरच ग्रामपंचायत सरपंच यांचा ठराव घेवून लेखी निवेदन देण्यात येणार असल्याचे अजगर खोत यांनी सांगितले आहे.

कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी डी.डी. टेळे यांनी दिलेल्या माहितीत म्हटले की दामत गावातील मुस्लिम समाजाने घेतलेला निर्णय हा स्वागतार्ह आहे शिवाय येथील सांभाळत असलेल्या जनावरांना पशु वैद्यकीय अधिकारी यांच्या माध्यमातून लवकरच टॅगिंग करण्यात येणार आहे म्हणून सांगितले.

# निलेश कोकरे पोलीस दलात

**खोपोली : प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील लोहगडाच्या पायथ्याशी असलेल्या घेरेवाडी येथील निलेश बाळू कोकरे यांची नुकतीच महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली असल्याने ग्रामस्थांनी त्यांची भव्य मिरवणुक काढून भव्य सत्कार केला आहे

निलेश बाळू कोकरे हे एमएच करिअर अकॅडमी कार्ला येथील विद्यार्थी असून त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण गावासाह तालुक्याचे नाव मोठे झाले आहे. त्यांनी नुकतीच महाराष्ट्र पोलीस दलाची परीक्षा उत्तीर्ण होऊन येरवडा कारागृह येथे त्यांची निवड झाली आहे,निलेश कोकरे यांची निवड होताच सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत. निलेशला मार्गदर्शन करणारे शिक्षकांचे आणि अकॅडमीचे आभार मानले आहेत.




**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ०५/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक २३/०४/२०२५ रोजी दैनिक प्रहार, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई , दैनिक ग्लोबल टाईम्स, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | वागळे औद्योगिक क्षेत्र ठाणे येथील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती ... प्रादेशिक कार्यालय १, २ व विभाग कार्यालय १ व २ ठाणे येथे विद्यमान प्रणाली अपग्रेड करण्यासाठी यूपीएस बॅटरीसह १० केव्हीए क्षमतेचे यूपीएस बसवणे व कार्यान्वित करणे. | ₹ १२,१९,१८४.०० |
| २. | विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील उप विभाग कार्यालयाची दुरुस्ती करणे. | ₹ ३६,४८,६५०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २३/०५/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.



**कनक समृद्धी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी मर्यादित पनवेल**
**प्लॉट नंबर ३६,मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी,पनवेल**

**निविदा सूचना**

याद्वारे सर्व व्यावसायिक कंत्राटदार इत्यादी यांना सुचित करण्यात येते आहे की,सोसायटीने ठरवल्याप्रमाणे पूर्ण बिल्डिंगला आतून आणि बाहेरून रंगकाम व लिकेज रिपेरिंग करायचा असून अंदाजीय दरपत्रक मागणी करण्यात येत आहे, तरी या कामी इच्छुकांनी आपले दर सादर करावेत. सदर कामासाठी आपण स्वतः मुलाकात घेऊन कामाची पाहणी करू शकता.दरपत्रक मागवण्याची शेवटची दिनांक ३१ मे २०२५ आहे.

**सही/-**
सेक्रेटरी
(संपर्क क्रमांक ९८९२१५६८६३)
कनक समृद्धी को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्यादित पनवेल



**निविदा नोटीस**

अरिहंत अर्हम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कोप्रोली येथे नदीच्या बाजूच्या बंधारा भिंतीच्या पुनर्बाधणीसाठी अनुभवी व मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून, ज्यांना समान कामाच्या अंमलबजावणीचा अनुभव आहे त्यांच्याकडून सीलबंद पाकिटातील निविदा मागविण्यात येत आहेत

निविदा वैधता कालावधी: १४ मे २०२५ ते १८ मे २०२५ (संध्याकाळी २०:०० वाजेपर्यंत)
निविदा उघडण्याची दिनांक व वेळ: १८ मे २०२५ रोजी २१:०० वाजता

निविदा तपशील आणि जागेची पाहणी (वेळ: सकाळी ९:३० ते सायं. १९:०० वाजेपर्यंत) यासाठी खालील पत्त्यावर भेट द्याः

खालील पत्ता: अरिहंत अर्हम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कोप्रोली, पनवेल माथेसन रोड, पनवेल, रायगड ४१०२०६
संपर्क क्रमांकः ७७५७९७५७५२

दिनांक : १२/०५/२०२५

**सही/-** **अध्यक्ष** **श्री. जय प्रकाश सिन्हा**

**सही/-** **सचिव** **श्री. दत्ता मुळे**

**अरिहंत अर्हम सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**

# पोलिसांची माहिती आता 'चॅटबोट'वर

## नवी मुंबई राज्यातील पहिले पोलीस आयुक्तालय

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलीस दलाने नागरिकांशी समाज माध्यमाद्वारे संवाद साधण्याच्या प्रक्रियेत आणखी एक नवे पाऊल टाकले आहे. पोलिसांनी नागरिकांना घरबसल्या पोलीस दलाविषयी तसेच पोलिसांच्या कार्य पध्दतीविषयी कुठल्याही प्रकारची माहिती मिळवता यावी, यासाठी चॅटबोट सेवा सुरू केली आहे. त्यामुळे नागरिकांना नेहमी भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे 'चॅटबोट'द्वारे एका क्लिकवर मिळणार आहेत. चॅटबोट सेवा सुरू करणारे नवी मुंबई राज्यातील पहिले पोलीस आयुक्तालय ठरले आहे.




तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नागरिकांना सेवा-सुविधा आणखी एक नवे पाऊल टाकले आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या प्रयत्नाने सुरु करण्यात आलेल्या या 'चॅटबोट'चे उद्घाटन नुकतेच राज्याचे गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम यांच्या हस्ते झाले.

नवी मुंबई पोलिसांच्या अधिकृत वेबसाईटद्वारे नागरिकांना 'चॅटबोट'ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नवी मुंबई पोलिसांशी संवाद साधता येणार आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना पोलीस स्टेशनमध्ये प्रत्यक्ष जाण्याची गरज न पडता अनेक शंका आणि चौकशी 'चॅटबोट'द्वारे करता येणार आहे. विशेष म्हणजे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेतून नागरिकांना संवाद साधता येणार आहे.

एआय चॅटबोट'चा वापर करण्यासाठी नवी मुंबई पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावर (navimrm©ba{iolibe.gov.in) उजव्या बाजुला खालील बाजुस नवी मुंबई पोलीस हेल्पवर क्लिक केल्यानंतर चॅटबॉट पेजवर जाता येणार आहे. या 'चॅटबोट'मध्ये नागरिकांना पोलीस सेवांशी संबंधित प्रश्न विचारुन माहिती घेता येणार आहे. तसेच वरच्या बाजुला असलेल्या चॅट नाऊ वर क्लिक करुन चॅट शॉट सोबत संवाद देखील साधता येणार आहे.

**'या' मिळणार सुविधा**

गुन्हे टाळण्यासाठी सुरक्षा टिप्स आणि सायबर सुरक्षा, फिशिंग, ऑनलाईन फसवणूक, चोरी, इत्यादी गुन्ह्यांवर प्रतिबंधक उपाय सांगितले जाणार आहे. तसेच नवीन गुन्हेगारी पध्दतींबद्दल नागरिकांना सतर्क केले जाणार आहे. पोलीस स्टेशनचे तपशील, केसची प्रगती, दस्तऐवज आवश्यकता, आदि माहिती सहज शोधता येणार आहे. ऑनलाईन एफआयआर, पासपोर्ट व्हेरिफिकेशन आणि इतर सेवांसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. नागरिकांना योग्य अधिकाऱ्यांशी किंवा विभागाशी जोडले जाणार आहे. पोलीस आणि नागरिक यांच्यात पारदर्शक संवाद वाढविण्यासाठी चॅटबॉट वापरला जाणार असून नागरिक त्यांच्या सूचना, तक्रारी किंवा प्रश्न थेट पोलिसांशी सामायिक करु शकणार आहेत.

# भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी अविनाश कोळी यांची पुनर्नियुक्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संघटन कौशल्य, कार्यक्षमता व पक्षशिस्तीसाठी ओळखले जाणारे अविनाश कोळी यांची भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेश भाजपकडून मंगळवारी (दि. १३) राज्यातील सहा विभागात ५८ जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये अविनाश कोळी यांचा समावेश आहे.



भाजपने महाराष्ट्रातील विविध जिल्हाध्यक्षांची नियुक्ती प्रक्रिया नुकतीच पार पडली आहे. पक्षाच्या संघटनात्मक मजबुतीसाठी व स्थानिक पातळीवर प्रभावी नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता व कार्यक्षमता राखण्यासाठी पक्षाने ठोस निकष निश्चित केले, ज्यामध्ये जिल्हाध्यक्षपदासाठी ६० वर्षांखालील उमेदवारांनाच प्राधान्य देण्यात आले आहे.

अविनाश कोळी यांचे संघटनात्मक कार्यासाठी नियोजन उत्तम प्रकारचे असते. पक्षाची ध्येयधोरणे आणि उपक्रम नेहमीच यशस्वी करत त्यांनी यापूर्वीही जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी चोख बजावली आहे तसेच निवडणुका जिंकण्यात त्यांनी जिल्हाध्यक्ष म्हणून उत्कृष्ट काम केले आहे. त्याचबरोबर संघटनात्मक जबाबदारीने काम केले आहे. त्यामुळे त्यांची महाराष्ट्र प्रदेश भाजपने पुनर्नियुक्ती जाहीर केली.

अविनाश कोळी यांच्या पुनर्नियुक्तीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही निवड अत्यंत फलदायी ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे तसेच पुढील वाटचालकरिता त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# एनएमएमटी बसमध्ये महिलेच्या दागिन्यांवर डल्ला

**नवी मुंबई : बातमीदार**

एनएमएमटी बसने प्रवास करणाऱ्या महिलेचे साडेपाच लाखांचे दागिने चोरीला गेले. गर्दीचा फायदा घेऊन चोराने डल्ला मारला. या प्रकरणी कोपरखैरणे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




उलवे परिसरात राहणाऱ्या वत्सला तांडेल (५८) या जावयाच्या बहिणीच्या हळदी समारंभाला जाण्यासाठी नेरुळ येथून बसने घणसोलीला जात होत्या. एनएमएमटीच्या २० नंबरच्या बसने प्रवास करत असताना घणसोली स्थानकालगत मंगळसूत्र व हार असा ५ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी कोपरखैरणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलिस चोराचा शोध घेत आहेत.

# पनवेलमध्ये ब्रम्हचैतन्य मासिक संगीत सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ४२वे पुष्प झाले. पनवेल येथील श्री गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात सादर झालेल्या या कार्यक्रमात पुणे येथील गायिका श्रुती मंदार देव आणि स्नेहल अभिजीत जायदे ह्यांनी आपली गायन सेवा सादर केली.

श्रुती देव ह्यांनी संगीत सभेची सुरुवात शास्त्रीय गायनाने केली. त्यानंतर दोघींनी 'भक्तिच्या फुलांचा', नंतर पुरिया धनश्री रागातील 'श्रीरामाचे चरण धरावे' हा अभंग, तसेच 'श्रीरामाच्या पूजेसाठीव', 'हरी भजना वीण काळ' हे अभंग सादर केले. त्यानंतर त्यांनी 'नारायणा रमारमणा' आणि 'सोहम हर डमरू बाजे' ही नाट्यपदे आणि 'बाजे रे मुरलिया' हा अभंग सादर केला. 'धन्य भाग सेवा का' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता केली.



या कार्यक्रमाला तबलासाथ जयंत कुलकर्णी तर हार्मोनियमची साथ राजेंद्र काळे यांनी केली. चैतन्य कोशे यानी तालवाद्यसाथ केली. जयमाला कुलकर्णी व समीर सोमण यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. किरण गोखले यांनी ध्वनिसंयोजन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक व मठातील कार्यकर्त्यानी मोलाचे योगदान दिले.

# सीकेटी इंग्रजी माध्यम शाळेचे घवघवीत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचा दहावीचा निकाल मंगळवारी (दि.१३) जाहीर करण्यात आला. या वेळीही जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी)च्या इंग्रजी माध्यमाने १०० टक्के गुण प्राप्त करून घवघवीत संपादन केले आहे.

या वर्षी एकूण १८७ विद्यार्थी दहावी बोर्ड परिक्षेस प्रविष्ट झाले होते. एकूण १८७ विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. निकालाची वैशिष्ट्य म्हणजे विषेश योग्यता विद्यार्थी संख्या ११६, प्रथम श्रेणी विद्यार्थी संख्या ६३, द्वितीय श्रेणी विद्यार्थी संख्या ८ आहे.

यामध्ये प्रथम क्रमांक इंदुलकर सोहम सुधीर ९७.०० टक्के, द्वितीय क्रमांक कांबळे धनराज राजेंद्र ९५.२० टक्के, कोळपकर श्रेया दिलीप ९५.२० टक्के, तृतीय क्रमांक अधिक सार्थक रवींद्र ९५.०० टक्के यांनी मिळविला आहे.

१० वी च्या अभ्यासाचे योग्य नियोजन बोर्डाच्या परिक्षेकरता घेण्यात येणाऱ्या सराव परीक्षा तसेच शिक्षकांचे सुयोग्य मार्गदर्शन यामुळेच या शाळेतील विद्यार्थी दिवसेंदिवस अधिकाधिक गुण प्राप्त करून विद्यालयाचा नावलौकिक वाढवत आहेत, असे अनेक पालकांनी सांगितले. तसेच या विद्यालयात शिकल्याचा आम्हाला अभिमान वाटतो असे विद्यार्थ्यांनी नमूद केले.

सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांजकडून हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# सत्याग्रह महाविद्यालयात बुद्ध जयंती उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पाली भाषेतील बुद्ध वचनांचा अमोल ठेवा हा ब्राह्मण कुळातील सारीपुत्त, महामोग्गलायन यांच्यासारख्या बुध्दाच्या समकालीन निष्ठावंत भिक्खुंची मोठी देण आहे, असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी खारघर येथे बोलताना केले. सत्याग्रह महाविद्यालयात साजऱ्या झालेल्या तथागत बुध्दाच्या २५६९ व्या जयंती समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

या समारंभात माजी सहायक आयकर आयुक्त अरविंद सोनटक्के, पाली भाषेचे विभाग प्रमुख प्रा. सतीश पवार, प्राचार्या नेहा राणे हे व्यासपीठावर उपस्थित होते. बुध्दाच्या काळात महाराष्ट्रातील ब्राह्मण कुळातील बावरी या भिक्खूने तथागता कडून दीक्षा घेतली. त्यानंतर अश्मक प्रांतात धम्म प्रसाराचे त्याने उल्लेखनीय काम केले, असे सांगून डॉ. डोंगरगांवकर म्हणाले की, राज्यातील प्राचीन लेण्या आणि विहाराच्या उभारणीतही ब्राह्मण कुळातील भिक्खुंचा पुढाकार आणि सहभाग राहिला. त्यांचे बुध्दाच्या धम्माच्या इतिहासातील स्थान अविभाज्य असून त्यांचा ठसा अवीट आहे.

अवघी ३५ कोटी लोकसंख्या असलेला जपान या देशाने बुध्दाच्या विज्ञानवादाची कास धरल्यामुळेच तो प्रगत देश ठरला. त्यामुळे १४० कोटी लोकसंख्येच्या आपल्या देशालाही 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या बुध्दाच्या मार्गाने वाटचाल करणे गरजेचे आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. तर, अरविंद सोनटक्के यांनी बुद्ध हा विज्ञानवाद आणि बुद्धिवादाचा जनक आहे, असे सांगतानाच भारतीय संविधानानेसुद्धा विज्ञानवाद स्वीकारलेला आहे, याची आठवण करून दिली.

मराठीसोबतच पाली भाषेलाही केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला हे खरे. पण पाली भाषेबद्दल सरकारी पातळीवर अनास्थेचे दर्शन घडते, अशी खंत प्रा. सतीश पवार यांनी या वेळी व्यक्त केली.












**पनवेल : अविनाश कोळी यांची भारतीय जनता पक्षाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी पुनर्निवड करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, मुकूंद गावंड, शशिकांत पाटील, उरण तालुका अध्यक्ष धनेश गावंड, माजी सरपंच के.वाय. गावंड, करण ठाकूर, विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, केदार भगत, रूपेश नागवेकर, अमित ओझे, प्रीतम म्हात्रे, कोमल कोळी आदींनी अभिनंदन केले.**

# अपोलो हॉस्पिटल्समध्ये आंतरराष्ट्रीय नर्स दिन साजरा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अपोलो हॉस्पिटल्सने आंतरराष्ट्रीय नर्स दिनाच्या निमित्ताने जगभरातील आरोग्य सेवा संस्थांच्या सहयोगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले ज्यामध्ये नर्सिंगमधील उत्कृष्ट कामगिरीला सन्मानित करण्याबरोबरीनेच जागतिक आरोग्य व्यवस्था आणि आर्थिक लवचिकता कायम राखण्यामध्ये नर्सेसच्या महत्त्वपूर्ण भूमिकेला अधोरेखित करण्यावर देखील भर दिला गेला.



आंतरराष्ट्रीय नर्स दिवस नर्सिंग कर्मचाऱ्यांचे समर्पण, कौशल्ये आणि करुणा भावनेने करण्यात येणाऱ्या सेवेवर प्रकाश टाकतो, यावेळी अपोलो हॉस्पिटल्स नेटवर्कच्या युनिट्सनी एका आठवडाभराच्या कार्यक्रमांच्या शृंखलेचे आयोजन केले होते, यामध्ये विशेष भोजन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि एका इंटरॅक्टिव्ह इंस्टॉलेशन ग्रॅटिट्यूड वॉलचे अनावरण करण्यात आले. इंटरॅक्टिव्ह ग्रॅटिट्यूड वॉल हा विशेष डिझाईन करण्यात आलेला प्लॅटफॉर्म आहे ज्यावर सहकर्मचारी, रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांनी नर्सिंग कर्मचाऱ्यांच्या अथक प्रयत्नांविषयी आभार मानले.

# पनवेलमध्ये प्रथमच तीन दिवस आंबा महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर याच्या संकल्पनेतून भारतीय जनता पक्ष पनवेल शहरच्या वतीने १६ ते १८ मेपर्यंत पनवेलमध्ये प्रथमच आंबा महोत्सव तसेच महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सांस्कृतिक, मनोरंजन आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

शहरातील डॉ. पटवर्धन हॉस्पिटलसमोरील गुजराती शाळेच्या मैदानावर तीनही दिवस आंबा महोत्सव होणार आहे. या महोत्सवांतर्गत १६ मे सायंकाळी ६ वाजता महिलांसाठी 'खेळ खेळूया साऱ्याजणी चला जिंकूया अस्सल पैठणी', १७ मे रोजी सायंकाळी ७ वाजता 'अभंग रिपोस्ट', तर १८ मे तारखेला संगीत, नृत्य, कलेचा संगम असलेला 'वारसा संस्कृतीचा' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.


या महोत्सवाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रम प्रमुख माजी नगरसेविका रूचिता लोंढे, भाजप पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंजारराव यांनी केले आहे.

# पोलीस चौकीजवळ आढळला मृतदेह

**पनवेल :** घणसोली डी मार्ट पोलीस चौकीजवळ एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध रबाळे पोलीस करीत आहेत. अनोळखी मयत व्यक्तीचे वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे, अंगावर काळ्या रंगाचा शर्ट, निळ्या रंगाची फुल पॅन्ट, डोक्यावरील केस काळे पांढरे, दाढी मिशी बारीक काळी पांढरी, उंची पाच फुट पाच इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, निम गोरा आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने रबाळे पोलीस ठाणे किंवा सहा.पो.नि.वृषाली पवार (९८९०६८९८९४) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आदित्य मोतीवाले जिद्द आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा दीपस्तंभ

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर येथे शिक्षण घेत असलेला आदित्य मोतीवाले हा विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रेरणा घ्यावी असा एक आदर्श विद्यार्थी ठरला आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात सीबीएसई इयत्ता दहावीची परीक्षा देणाऱ्या आदित्यने ८३ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले असून त्याला मराठीत सर्वाधिक ९८ टक्के गुण प्राप्त झाले आहेत.



सिनिअर केजीपासून शाळेत शिक्षण घेत असलेला आदित्य हा अभ्यासात सदैव उजवा राहिला आहे, मात्र त्याच्या शैक्षणिक प्रवासात शारीरिक अडथळ्यांची मोठी लढाई आहे. सेरेब्रल पाल्सी या प्रगत नैराश्यात्मक आजारामुळे त्याची हालचाल, हातांचे समन्वय आणि दृष्टी यावर गंभीर परिणाम झाले आहेत, आणि आता तो चालू शकत नाही. तरीदेखील त्याची शिकण्याची ओढ आणि मेहनतीची तयारी यामध्ये कोणतीही कमी आलेली नाही.

आदित्यने आपल्या अभ्यासात सतत ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवत शाळेत आपली शैक्षणिक गुणवत्ता कायम राखली आहे. त्याच्या यशामागे तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि अतूट इच्छाशक्ती हे मुख्य घटक आहेत. तो अभ्यासासाठी लॅपटॉप, व्हॉइस असिस्टंट टूल्स, टेक्स्ट हायलायटर, ऑडिओ नोट्स आणि यूट्यूब ट्युटोरियल्स यांचा प्रभावीपणे वापर करतो. गुगल सर्च इंजिनसारख्या डिजिटल साधनांचा तो अत्यंत हुशारीने उपयोग करतो. विशेष म्हणजे तो दररोज तब्बल १६ तास अभ्यास करतो.

आदित्यच्या यशामध्ये त्याच्या कुटुंबाचे आणि शाळेचे मोलाचे योगदान आहे. त्याची आई गणित, विज्ञान प्रात्यक्षिके आणि अभ्यासाचे ध्वनीमुद्रण करण्यात त्याला मदत करते. शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांच्या नेतृत्वाखाली शाळेने त्याच्या शिक्षणासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. शिक्षक नियमित प्रगती परीक्षण, समुपदेशन, ऑनलाईन वर्ग आणि वैयक्तिक मार्गदर्शनाच्या माध्यमातून त्याला सहकार्य करत आहेत. वर्गमित्रही नोट्स व दैनंदिन शालेय कामांमध्ये मदत करतात.

मुख्याध्यापिका अलोनी स्वतः सीबीएसईच्या विशेष गरजांच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा आदित्यला मिळाव्यात यासाठी लक्ष ठेवतात आणि संपूर्ण शालेय कर्मचारीवर्ग आदित्यसाठी सकारात्मक व सहकार्यपूर्ण वातावरण तयार करतो.

भारतीय प्रशासकीय सेवेत प्रवेश घेण्याचे स्वप्न पाहणारा आदित्य हा धैर्य, आत्मविश्वास आणि चिकाटी याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्याची कथा ही दाखवते की जिथे इच्छाशक्ती, कौटुंबिक पाठबळ आणि योग्य शैक्षणिक वातावरण असेल, तिथे कोणतीही अडचण अडथळा ठरू शकत नाही.

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा संपूर्ण परिवार आदित्यच्या यशाचा अभिमान बाळगतो आणि त्याला भविष्यातील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

**(रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर)**

# ऐन उन्हाळ्यात ढगाळ वातावरण

## बदलत्या हवामानाचा मानवी आरोग्यावर परिणाम

**खोपोली : प्रतिनिधी**

सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत, पण अशातच ढगाळ वातावरण निर्माण होत असल्यामुळे मानवी आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मे महिना हा प्रखर उन्हाचा कालावधी असतो, परंतु गेल्या आठवड्यामध्ये अवकाळी पाऊस पडल्याने तालुक्याच्या ठिकाणी ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. या ढगाळ वातावरणामुळे हवामानात बदल होत असताना पहावयास मिळत आहे.

गंभीर बाब म्हणजे अशा वातावरणामुळे शरीराला थकवा जाणू लागलाय तसेच या आजारापासून बचाव करण्यासाठी प्रत्येक जण डॉक्टरचा सल्ला घेता ना दिसत आहे. या वर्षी मे महिन्यात अचानक वातावरणात बदल होऊन ढगाळ वातावरण तयार होते आणि यामुळे अनेक लहान-मोठ्यांच्या प्रकृतीत बिघाड होऊन त्यांना रुग्णालयकडे धाव घ्यावी लागत आहे.

मागील काही दिवसांपासून प्रखर उन्हामुळे प्रत्येक माणसाच्या जीवाची लाहीलाही होत असतांना अचानकपणे वातावरणात बदल होऊन ढगाळ वातावरणासह तालुक्यात तालुक्यात बऱ्याच ठिकाणी अवकाळी पाउस पडल्याने अनेकांना चिंतने ग्रासले आहे.



# कोलमांडला जंगलजेटी परिसरातील कांदळवन संरक्षित क्षेत्रात अखेर फलक

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील कोलमांडला येथील जंगलजेटी परिसरात मागील अनेक दिवसांपासून सुरू असलेली कांदळवनांची अवैध कत्तल अखेर प्रशासनाच्या दृष्टीस आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी हे क्षेत्र कांदळवन संरक्षित क्षेत्र आहे, असा फलक त्या ठिकाणी लावला आहे.

कांदळवनांची कत्तल ही पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यंत घातक ठरते. भारतीय दंडसंहिता अंतर्गत कलम २६९ (सार्वजनिक आरोग्यास धोका), पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६मधील कलम १५ व १९ तसेच वन्यजीव संरक्षण कायदा १९७२मधील कलम ९ अंतर्गत ही कत्तल गुन्ह्याच्या श्रेणीत मोडते. तरीही कोलमांडला परिसरात अनेक दिवसांपासून रात्रीच्या वेळी कांदळवन कापले जात असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थ व पर्यावरणप्रेमींनी केली होती.



या संदर्भात कोलमांडला ग्रामपंचायतचे सरपंच नितीन जोशी यांनी स्पष्टपणे सांगितले की, कांदळवन ही सार्वजनिक संपत्ती असून ती पर्यावरण व स्थानिक नागरिकांच्या संरक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहे. या संपत्तीची कत्तल करणे हा कायद्यानुसार गुन्हा असून दोषींवर कठोर कारवाई केली जावी.

या अवैध कत्तलीचा पर्दाफाश झाल्यानंतर प्रशासन जागे झाले असून या भागाला संरक्षित क्षेत्र घोषित करून अधिकृत फलक लावण्यात आलेला आहे. यापुढील काळात कोणीही या परिसरात तोड अथवा कोणतेही बांधकाम केल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत वनविभागाने दिले आहेत.

# राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेल जिल्हा उपाध्यक्षपदी अजीज गजगे

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्याक सेलच्या दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी माणगाव तालुक्यातील टेमपाले येथील पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते अजीज अहमद गजगे यांची नियुक्ती जिल्हाध्यक्ष नाझीम हसवारे यांनी केली आहे.



तशा आशयाचे नियुक्तीपत्र गजगे यांना नुकतेच सुतारवाडी येथे खासदार तटकरे यांच्या हस्ते देण्यात आले.

या वेळी खासदार तटकरे यांनी अजीज गजगे यांचे अभिनंदन करून त्यांना पक्षाचे काम जोरात करा. आपण तुम्ही सांगाल ती विकासकामे टप्प्याटप्प्याने मार्गी लावू, असे अभिवचन दिले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी प्रदेश कार्यकारिणी सदस्य मुक्तार वेळासकर, गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी, जिल्हा युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी यांच्यासह राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुकाध्यक्ष काका नवगणे तसेच टेमपाले ग्रामस्थ उपस्थित होते.

सर्वांनी गजगे यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## दि आर्ट ऑफ लिव्हिंगचे नवचैतन्य अभियान

# बॉडी मेंबर सुरेश मगर यांचा सत्कार

**रोहे : प्रतिनिधी**

दि आर्ट ऑफ लिव्हिंगच्या नवचैतन्य अभियानास सुरुवात झाली असून महाराष्ट्र अपेक्ष बॉडी मेंबर म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रोहा वाशी येथील सुरेश मगर यांची निवड झाली आहे. याबद्दल एसटीसी डॉ. नामदेव घोलप यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उदय सहस्रबुद्धे, डॉ. नरेंद्र जाधव, अशोक महामुनी, संजय राऊत, धीरज शिंदे, निळकंठ कदम, डॉ. अंजली पुराणिक, ऋतुजा लोखंडे, श्री. जगदाळे, रघुराम कामत, विनोद वाकलकर, सौ. घोलप, सौ. भारती माळी, संपदा शहा, प्रियांका पवार, सौ. सहस्रबुद्धे, सुप्रिया कुंभार, सुषमा तलवार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वर्षा कुवळेकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**अलिबाग : प्रतिनिधी**

कर्तृत्ववान व्यक्तींचे काम नवीन पिढीसमोर पुस्तकांमधून येणे आवश्यक आहे, असे मत ज्येष्ठ पत्रकार दिनकर गांगल यांनी व्यक्त केले.

वर्षा कुवळेकर यांनी लिहिलेल्या 'सफर खूबसूरत है मंजिल से भी' या पुस्तकाचे प्रकाशन गांगल यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. वरसोली येथील विठ्ठल मंदिर सभागृहात आयोजित पुस्तक प्रकाशन समारंभअध्यक्षस्थानी रायगड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार होते.

कार्यक्रमाला अश्विनी भिडे, शैला पाटील, सुप्रिया पाटील, ॲड. निळा तुळपुळे, सुरेखा पाटील, गिरीश तुळपुळे, आनंद कोळगावकर, ॲड. शिरीश लेले, शुभा गाडगीळ उपस्थित होते. अजित देशमुख यांनी प्रास्ताविक व ऋचा बल्लाळ यांनी सूत्रसंचालन केले, तर ॲड. पल्लवी तुळपुळे यांनी आभार मानले.

# सहिदा घरटकरांकडून आरोग्य केंद्रास सोलार पॅनल

**मुरुड : प्रतिनिधी**

कतार निवासी ख्यातकीर्त उद्योगपती तथा संजीवनी आरोग्य संस्थेचे आधारस्तंभ डॉ. सनाउलाह घरटकर यांच्या पत्नी सहिदा घरटकर यांनी नुकतीच कै. अंजनाबाई पुंडलिकराव लहाने हेल्थ अ‍ॅण्ड वेल्फेअर सेंटर येथे सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांनी संजीवनी आरोग्यसेवा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत डायलिसीस सेंटरसाठी उपयुक्त २० किलो वॅटचे सोलार पॅनल देण्याचे जाहीर केले.

सहिदा घरटकर यांच्यासमवेत 'संजीवनी'चे विभाग प्रमुख डॉ. मकबुल कोकाटे, कार्याध्यक्ष विजय सुर्वे, कुलसुम घरटकर, नगमाना खानजादे, वासंती उमरोटकर, फातिमा नवाब दाते आदी उपस्थित होते.



सोलार पॅनलमुळे संजीवनी आरोग्यसेवेमध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना नियमित विद्युत पुरवठ्याची उत्तम सोय होणार असून भरमसाठ येणाऱ्या विजबिलापासून मोठी बचत होईल. संस्थेला या सोलर सिस्टीमची अतिशय गरज होती. ही गरज ओळखून केलेल्या या मदतीबद्दल व आर्थिक योगदानाबद्दल संपूर्ण घरटकर परिवारांचे संस्थेचे सर्व पदाधिकारी तथा कार्यकारिणीने ऋण व्यक्त केले आहेत.

# अमर सलागरे यांना गगनभरारी समर्थ पुरस्कार

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील अमर सलागरे यांना समर्थ फाउंडेशन व वल्लरी मीडिया यांच्यामार्फत शैक्षणिक, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन नुकतेच पुणे येथे गगनभरारी समर्थ पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महाराष्ट्रातील २१ मानकऱ्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला तसेच वल्लरी मीडियामार्फत या २१ पुरस्कारप्राप्त मानकऱ्यांची यशोगाथा असलेले गगनभरारी हे पुस्तक मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आले. या कार्यक्रमास राजेश पांडे, विद्याधर ताठे, दीपक मोकाशी यांच्यासह समर्थ फाउंडेशनचे अध्यक्ष किरण इनामदार व वल्लरी मीडियाचे व्यंकटेश कल्याणकर उपस्थित होते.

अमर सलागरे यांना गेली २५ वर्षे शैक्षणिक, सामाजिक व क्रीडा क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार मिळाला असून समाजातील सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.




# दुर्ग संवर्धन मोहिमेत कुंभळमाच ग्रामस्थांचा मोलाचा सहभाग

**नागोठणे : बातमीदार**

रायगड जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील जिते येथील कुंभळमाच हेच ते गाव आहे, ज्यांनी वेळोवेळी ट्रेकर्स, गिर्यारोहक, आणि इतर पर्यटकांना त्यांच्यावर आलेल्या आपत्तीजनक प्रसंगी नि:स्वार्थ भावनेने मदत केली आहे. गावकऱ्यांनी कधीही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता केवळ माणुसकीच्या नात्याने आणि सह्याद्रीच्या प्रेमातून दिलेले योगदान वाखाणण्याजोगे आहे, असे कौतुकास्पद उदगार शौर्य सह्याद्री ॲडव्हेंचर ॲण्ड ट्रेकर्सचे संस्थापक तसेच गिर्यारोहक सुरेश पोळेकर यांनी बोलताना काढले.

अधिक माहिती देताना सुरेश पोळकर यांनी सांगितले की, विशेष बाब म्हणजे सध्याच्या स्थितीला गावात जाण्यासाठी सुसज्ज रस्तादेखील उपलब्ध नाही. रस्त्याअभावी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तरीही समाजासाठी काही तरी देणे लागतो या भावनेने प्रेरित होऊन समस्त ग्रामस्थ नेहमीच एकमेकांच्या मदतीला धावून येतात.



अत्यंत कठीण परिस्थितीतसुद्धा गावकरी आपली सामाजिक जबाबदारी पार पाडत आहेत. आजारी व्यक्ती, वृद्ध नागरिक यांना आवश्यक ती मदत मिळावी यासाठी गावातील तरुण मंडळी पाठीवर उचलून पाच ते सात किलोमीटरचा पायपीट करत, डोंगरदऱ्या पार करत शेजारच्या गावांमध्ये घेऊन जातात. अशावेळी एकमेकांवरील विश्वास, आपुलकी, आणि 'आपलं गाव, आपली जबाबदारी' ही भावना प्रकर्षाने दिसून येते.

शौर्य सह्याद्री ॲडव्हेंचर आणि टीम कुर्डुगड यांच्यासारख्या दुर्गप्रेमी संस्थांनी गेल्या काही काळात माणगाव विभागात दुर्ग संवर्धनाच्या दृष्टीने भरीव कामगिरी केली आहे. याच कार्याची दखल घेत कुंभळमाच्या ग्रामस्थांनी येत्या काळात मोहिमांचे नियोजन स्थानिक स्तरावरच राबवण्याचा पुढाकार घेतला आहे. या उपक्रमातून त्यांनी एक सामाजिक बांधिलकीचे आणि सहकार्याचे अत्युत्तम उदाहरण सगळ्यांसमोर ठेवले आहे.

११ मे रोजी कुंभळमाच्या ग्रामस्थांच्या वतीने विशेष चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्थानिकांनी दुर्ग संवर्धन, पर्यावरण रक्षण आणि शाश्वत पर्यटन या विषयी सखोल चर्चा केली. या कार्यक्रमात शौर्य सह्याद्री ॲडव्हेंचर आणि टीम कुर्डुगड यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हा सन्मानाचा आणि प्रेरणेचा क्षण होता.

कार्यक्रमात शौर्य सह्याद्री ॲडव्हेंचर ॲण्ड ट्रेकर्सचे संस्थापक तसेच गिर्यारोहक सुरेश पोळेकर, टीम कुर्डुगडचे दिवेश कदम, प्रमोद पडवळ, सानिया साळवी, तनिष्क साळवी, श्रेयस पंदेकर कुंभळमाच ग्रामस्थ धोंडू भिवाजी पोळेकर, शरद पोळेकर, जनार्दन पोळेकर, नामदेव पोळेकर, विक्रम पोळेकर, गणपत पोळेकर, मंगेश पोळेकर, केशव पोळेकर, निलेश पोळेकर, संतोष पोळेकर व इतर सर्व ग्रामस्थ या आगळ्यावेगळ्या उपक्रमासाठी आणि अमूल्य आदरभावासाठी संपूर्ण टीमकडून कुंभळमाच्या सर्व ग्रामस्थांचे मन:पूर्वक आभार मानले.

सह्याद्रीचे रक्षण हीच आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे तसेच ही परिस्थिती पाहता गावासाठी एक सुस्थित रस्त्याची आवश्यकता केवळ दैनंदिन जीवनासाठीच नव्हे, तर आरोग्य, शिक्षण आणि विकासाच्या दृष्टीने अत्यावश्यक बनली आहे. शासनाने व प्रशासनाने याची तत्काळ दखल घ्यावी, अशी मागणी शौर्य सह्याद्री ॲडव्हेंचर ॲण्ड ट्रेकर्सचे संस्थापक तसेच गिर्यारोहक सुरेश पोळेकर व त्यांच्या टीमकडून करण्यात येत आहे.

# वावर्ले इंग्लिश स्कूलचा ८६.१६ टक्के निकाल

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२५मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत खालापूर तालुक्यातील दुर्गम भागातील न्यू इंग्लिश स्कूलचा निकाल ८६.१६ टक्के लागला. याबद्दल शाळा व विद्यार्थी यांचे अभिनंदन होत आहे.

यू इंग्लिश स्कूलमधील एकूण २६ विद्यार्थी बारावीच्या परीक्षेस बसले होते. त्यातील २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेचा निकाल ८६.१६ टक्के लागला. दीपक कोंडीराम गोरे ८६.२०, तन्वी गंगाराम हिरवे ६४.६०, प्रज्वल किशोर भद्रिके ६४, विवेक नितीन आखाडे ६०, सुजल भाऊ गोरे ५७.८० टक्के असे गुण मिळवून पहिल्या पाच क्रमांकानी शाळेतून उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे सरपंच प्रिया विचारे यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आयपीएलचे उर्वरित सामने १७ मेपासून

## बीसीसीआयची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने इंडियन क्रिकेट लीग २०२५ स्पर्धा आठवडाभरासाठी स्थगित करण्यात आली होती. भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रविरामावर एकमत झाल्यानंतर ही स्पर्धा पुन्हा सुरू केला जात आहे. १७ मेपासून आयपीएलचे सामने पुन्हा खेळवले जाणार आहेत, तर ३ जून रोजी स्पर्धेचा अंतिम सामना खेळवला जाईल.

या कालावधीत १७ सामने सहा ठिकाणी खेळवले जातील. या सुधारित वेळापत्राकात दोन डबल हेडर सामन्यांचा समावेश आहे, जे दोन रविवारी खेळवले जाणार आहेत.

आयपीएल २०२५ स्पर्धेतील एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत. त्यापैकी ५८ सामने पूर्ण झाले आहेत, तर १६ सामने अजूनही शिल्लक आहेत, ज्यात प्लेऑफच्या सामन्यांसह फायनलचादेखील समावेश आहे. या स्पर्धेतील फायनलचा सामना २५ मे रोजी होणार होता, पण आता सुधारित वेळापत्रकानुसार अंतिम सामना हा ३ जून रोजी होणार आहे.

आयपीएल २०२५मधील उर्वरित सामने बंगळुरू, जयपूर, दिल्ली, लखनौ, मुंबई आणि अहमदाबाद येथे खेळवण्यात येतील. नवीन वेळापत्रकात रविवारी खेळवल्या जाणाऱ्या दोन डबलहेडर सामन्यांचाही समावेश आहे. पहिला डबल हेडर सामना १८ मे रोजी आहे. रविवारी दुपारी राजस्थान रॉयल्सचा सामना जयपूरमध्ये पंजाब किंग्जशी होईल, तर त्याच दिवशी संध्याकाळी दिल्ली कॅपिटल्सचा सामना दिल्लीमध्ये गुजरात टायटन्सशी होईल. त्यानंतर दुसरा डबल हेडर २५ मे रोजी होईल. रविवारी गुजरात टायटन्स दुपारी चेन्नई सुपर किंग्जशी आणि सनरायझर्स हैदराबाद संध्याकाळी ७:३० वाजता कोलकाता नाईट रायडर्सशी लढेल.

२८ मे, ३१ मे आणि २ जून रोजी कोणतेही सामने खेळवले जाणार नाहीत. प्लेऑफ २९ मेपासून सुरू होतील. पहिला क्वालिफायर सामना २९ मे रोजी होईल. एलिमिनेटर सामना ३० मे रोजी खेळवला जाईल. त्यानंतर दुसरा क्वालिफायर सामना १ जून रोजी खेळला जाईल, तर अंतिम सामना ३ जून रोजी होईल.

**फ्लेऑफचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| क्वालिफायर १ | २९ मे |
| एलिमिनेटर | ३० मे |
| क्वालिफायर २ | १ जून |
| **अंतिम सामना** | **३ जून** |

# कर्जतच्या गायत्री बडेकरला आशिया पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत कांस्यपदक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डेहराडून येथे ५ ते १२ मे या कालावधीत झालेल्या आशियाई पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशीप २०२५ स्पर्धेत सब ज्युनिअर महिला (१९ वर्षाआतील) गटात इंडिया पॉवरलिफ्टिंग क्लब कर्जतची खेळाडू गायत्री महेश बडेकर हिने ४३ किलो वजनी गटात रौप्यपदक प्राप्त केले.

या स्पर्धेत स्कॉट, बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या तीन प्रकारात पूर्वीचे आशियाई विक्रम मोडून गायत्रीने नवीन विक्रम आपल्या नावे करून भारताचे नाव उज्वल केले आहे तसेच तिन्ही प्रकारात सर्वाधिक ३२५ किलो वजन उचलून नवीन विक्रम आपल्या नावे करून स्कॉट, बेंच आणि डेडलिफ्ट आणि एकूण असे एकाच वेळी चारही प्रकारात विक्रमी चार सुवर्णपदके प्राप्त केली आहेत.

या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने गायत्रीचे अभिनंदन करून आनंद व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव, शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित सचिव संजय सरदेसाई यांनीसुद्धा गायत्रीचे कौतुक केले आाणि पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

गायत्री बडेकर हिला राष्ट्रीय कुस्ती, वेटलिफ्टिंग पॉवरलिफ्टिंग खेळाडू हनुमंत खरात यांचे मोलाचे प्रशिक्षण-मार्गदर्शन लाभले आहे तसेच प्रथमेश भालेकर, अंजली येवले यांचेही सरावासाठी सहकार्य लाभले.

गायत्री बडेकर ही एका मध्यमवर्गीय कुटुंबातील असून वडिलांचा रिक्षाचालकाचा व्यवसाय आहे. आपल्या मुलीने या खेळामध्ये चांगली प्रगती करावी असे तिचे वडील महेश बडेकर आणि आई आशा बडेकर यांना वाटते. आपल्या मुलीने मेहनतीने चार सुवर्णपदक मिळवली याचा आनंद खूप वाटतो झाला आहे, असे त्यांनी सांगितले.

गायत्री बडेकरने मिळवलेल्या यशामुळे आणखी एक महिला खेळाडू आंतरराष्ट्रीय पदक विजेती झाली याचा आनंद वाटतो, असे मत पॉवरलिफ्टिंग रायगडचे अध्यक्ष गिरीश शरद वेदक यांनी व्यक्त केले आहे, तर सलोनी मोरे, अमृता भगत या आंतरराष्ट्रीय पदक विजेत्या महिला खेळाडूंच्या यादीत गायत्रचा समावेश झाला आहे याचा आनंद असल्याचे पॉवरलिफ्टिंग रायगडचे सचिव अरुण पाटकर आणि सहसचिव सचिन भालेराव यांनी म्हटले.

# टेबल टेनिसमध्ये काव्याचा 'सुवर्ण' धमाका कायम

**राजगीर (बिहार) : वृत्तसंस्था**

टेबल टेनिसमध्ये अव्वल मानांकित खेळाडूंवर मात करीत महाराष्ट्राच्या काव्या भटने सातव्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत सुवर्ण पदकाचे शिखर सर केले. तामिळनाडूच्या एम हंसिनीला ४-१गेमने पराभूत करून स्पर्धेतील सलग दुसरे सुवर्णपदक जिंकण्याचा करिष्मा काव्याने घडविला.

राजगीर क्रीडा विद्यापीठाच्या हॉलमध्ये संपलेल्या टेबल टेनिस स्पर्धेत सुवर्णासह कांस्यपदकाची कमाई महाराष्ट्राने केली. मुलींच्या एकेरीत दिव्याश्री भौमिकने



कांस्यपदकाची कमाई केली. काव्या व दिव्याश्री हे स्पर्धेतील दुसरे पदक आहे. या जोडीने दुहेरीत सुवर्णपदक जिंकले होते.

एकेरीच्या अंतिम लढतीत काव्याने अव्वल मानांकित तामिळनाडूच्या एम हंसिनीला १२-१४, ११-८,११-८, ११-९, ११-१ गेमने पराभूत केले. पहिला गेम गमविल्यानंतरही आत्मविश्वासने खेळी करीत काव्याने बाजी मारली. मुलींच्या कांस्यपदकाच्या लढतीत दिव्याश्री भौमिकने महाराष्ट्राच्याच सुकृती शर्माचा १२-१०, ११-४, ११-६ गेमने पराभव केला. काव्या व दिव्याश्रीने पदापर्णातच दोन पदक जिंकली आहेत.

# साईराजचे सोनेरी यश; तनुजालाही सुवर्ण! वेटलिफ्टिंगमध्ये महाराष्ट्राला दोन सुवर्णपदके

**राजगीर (बिहार) : वृत्तसंस्था**


मनमाडचा साईराज परदेशी याने ७व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील वेटलिफ्टिंगमध्ये नव्या स्पर्धा विक्रमासह सोनेरी यशाला गवसणी घातल. कराडच्या तनुजा साळुंखे हिनेही वेटलिफ्टिंगमध्ये महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. १२वीच्या परिक्षेमुळे सरावाला काही दिवस ब्रेक दिल्यामुळे तिला नव्या विक्रमाला गवसणी घालता आली नाही.

राजगीर क्रीडा विद्यापीठाचा परिसरात सुरू असलेल्या वेटलिफ्टिंग हॉलमध्ये सलग तिसऱ्या दिवशी महाराष्ट्राचा जयजयकार दुमदुमला. गतस्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या साईराज परदेशी यांने ८१ किलो गटात निर्विवाद वर्चस्व गाजविने. खेलो इंडिया स्पर्धेत माझी स्पर्धा ही माझ्याशीच आहे, हे दाखवून दिले. त्याने स्नॅचमध्ये तिसर्या प्रयत्नात विक्रमी १४० किलो वजन उचलले. त्यानंतर क्लिन ॲण्ड जर्कमध्ये त्याने दुसर्या प्रयत्नात सर्वाधिक १७२ किलो वजन उचलले. तिसर्या प्रयत्नाची गरजही न वाटलेल्या साईराजने एकूण ३१२ वजनाची कामगिरी करत नव्या विक्रमासह सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. रौप्यपदक विजेत्या आंध्र प्रदेशच्या एम तरूणला (स्नॅचमध्ये १२६, तर क्लिन ॲण्ड जर्कमध्ये १६१ किलो)



एकूण २८७ वजनाची कामगिरी करता आली. उत्तर प्रदेशच्या आयुष राणाने (स्नॅचमध्ये ११९ किलो, तर क्लिन ॲण्ड जर्कमध्ये १४५ किलो) एकूण २६४ किलो वजन उचलत कांस्यपदक जिंकले.

नुकताच बारावी पास झालेल्या साईराज परदेशीने ८१ किलो गटात नव्या विक्रमासह सुवर्णयश मिळविताना




स्वत:चाच विक्रम मोडला. त्याने स्नॅचमधील स्वत:चाच १३९ किलोचा विक्रम १४० किलो वजन उचलून मोडीत काढला. हीच कमाल त्याने क्लिन ॲण्ड जर्कमध्येही केली. त्याने या प्रकारातही स्वत:चा १७१ किलो वजनाचा विक्रम मोडीत काढताना १७२ किलो वजन उचलले. त्यामुळे अर्थातच त्याचा एकूण ३१२ किलो वजन उचलण्याचाही नवा विक्रम प्रस्थापित झाला. प्रवीण व्यवहारे, डी.डी. शर्मा, अलोकेश बर्वा यांचे साईराजला मार्गदर्शन लाभलेले आहे.

मुलींच्या विभागात दिल्लीतील राष्ट्रीय शालेय स्पर्धेत सुवर्ण आणि हिमाचल प्रदेशात झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक मिळविलेल्या तनुजा पोळकडून महाराष्ट्राला खेलो इंडियातही सुवर्णपदकाचीच आशा होती. अपेक्षेप्रमाणे तीने सुवर्णयश मिळविले, पण तिला आपल्या सर्वोत्तम कामगिरीपर्यंत पोहचता आले नाही. तनुजाने स्नॅचमध्ये ६८ किलोच्या पहिल्या प्रयत्नात फाऊल केले. मग दुसऱ्या प्रयत्नात हे वजन उचलून तिने तिसऱ्या प्रयत्नात ७१ किलो वजन उचलले. क्लिन ॲण्ड जर्कमध्ये तनुजाने दुसऱ्या प्रयत्नात १०० किलो वजन उचलले. अशा प्रकारे तिने चूरशीच्या लढतीत एकूण १७१ किलो वजन उचलून अवघ्या एक किलो अधिक वजनाने सुवर्णपदकाला गवसणी घातली. आंध्र प्रदेशच्या थरांगिणी कारंगी हिने स्नॅचमध्ये ७४, तर क्लीन ॲण्ड जर्कमध्ये ९६ किलो असे एकूण १७१ किलो वजन उचलून रौप्यपदक जिंकले. आसामची भावना गोगोई हिने (स्नॅचमध्ये ७५, तर क्लिन ॲण्ड जर्कमध्ये ९२ किलो) एकूण १६७ किलो वजन कांस्यपदक मिळविले.

तनुजा पोळ हिने सुवर्णपदक निश्चित केल्यानंतर क्लिन ॲण्ड जर्कमधील अखेरच्या प्रयत्नात खेलो इंडियातील नव्या विक्रमासाठी १०६ किलो वजन उचलण्याचा विडा उचलला.

स्नॅचमध्ये पहिल्या प्रयत्नात फाऊल झाल्याने तिला ७१ किलोवरच समाधान मानावे लागले. त्यामुळे आता क्लिन ॲण्ड जर्कमध्ये विक्रमासह सुवर्णपदक जिंकण्याची तिला संधी होती. मात्र, सरावातील खंडामुळे तनुजाला १०६ किलो वजन पेलवले नाही. त्यामुळे तिच्या सुवर्णयशाला विक्रमाचे कोंदन लाभू शकले नाही.

# तलवारबाजीत साईप्रसादला सुवर्ण, तर रोहनला रौप्यपदक





**पटना: वृत्त संस्था**

महाराष्ट्राच्या खेळाडूंनी प्रथमच तलवारबाजीत प्रकारात सर्वोत्तम कामगिरी करीत सातव्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत एक सुवर्ण, एक रौप्यपदकाची कामगिरी केली. लातूरमध्ये ड्रायव्हरचा मुलगा असणाऱ्या साईप्रसाद जंगवाडने सुवर्ण, तर रोहन शहाने रौप्यपदक जिंकून दिवस गाजविला.

राजगीर क्रीडा विद्यापीठाचा परिसरात सुरू असलेल्या तलवारबाजीतील ईपी वैयक्तिक प्रकारात साईप्रसाद जंगवाडने सोनेरी खेळी केली. अंतिम लढतीत गुजरातच्या मनीष कुमार चौधरीचा श्रीपादने १५-१० गुणांनी पराभव केला. सुरूवातीपासून आक्रमक खेळाचे प्रदर्शन घडवित साईप्रसादने महाराष्ट्रासाठी सोनेरी यश संपादन केले. १६ वर्षीय साईप्रसाद छत्रपती संभाजीनगरमधील साईच्या प्रशिक्षण केंद्रात सराव करत असतो. ज्युनियर राष्ट्रकुल स्पर्धेत सांघिक कांस्य जिंकणाऱ्या १६ वर्षीय साईप्रसादचे वडील ड्रायव्हर आहेत.

# पाकिस्तानात खेळायला गेलेला परदेशी खेळाडू रडला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानला एकामागून एक मोठे हादरे दिले. त्यामुळे त्यांना मोठा फटका बसला. या दरम्यान पाकिस्तान क्रिकेट लीगही सुरू होती, पण भारताच्या ऑपरेशन सिंदूरमुळे ती रद्द करावी लागली. पाकिस्तान सोडून जे परदेशी खेळाडू निघाले होते, त्यांच्यावर बिकट अवस्था आली होती.

पाकिस्तानात खेळायला आलेला एक खेळाडू रडायलाच लागला. परदेशी खेळाडू जेव्हा दुबईत पोहचले तेव्हा सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. त्या वेळी सर्वात घाबरलेला टॉम करन सर्वांना म्हणाला की, आता मी पाकिस्तानमध्ये कधीच पाय ठेवणार नाही.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com